ISSN-2320-4494
RNI No.MAHAUL03008/13/2012-TC
UGC Approved

# POWER OF KNOWLEDGE

An International Multilingual Quarterly Refereed Research Journal

VOLUME-I
ISSUE-XX
Oct-Dec.2017



UGC Approved Sr.No.45681

ARTS | COMMERCE
SCIENCE | AGRICULTURE
EDUCATION | MANAGEMENT
MEDICAL | ENGINEERING & IT I LAW
PHARMACY | PHYSICAL EDUCATION
SOCIAL SCIENCE | JOURNALISM

Editor
Dr. Sadashiv H. Sarkate

E-mail : powerofknowledge3@gmail.com
www.powerofknowledge.co.in

# अनुक्रमणिका



| अ. क्र. | प्रकरण | संशोधक | पृष्ठ क्रं. |
|---|---|---|---|
| १ | INFIUENCE OF GOOD AND SERVICES TAX (GST) ON INDIAN ECONOMY | Dr.Gangadhar R. Bhuktar | १ |
| २ | DIGITAL INDIA: DIGITALIZATION | Mohamad Mustafa A. Mujawar<br>Dr. Chandrashekar C. Banasode | १० |
| ३ | CHANGING ECOLOGICAL SCENARIO OF LONAR CRATER LAKE, BULDHANA DISTRICT OF MAHARASHTRA. | Dr.Atul M. JETHE | १५ |
| ४ | Supply Chain Management and Global Distribution | Dr. D. R. Panzade | २२ |
| ५ | श्रीमहात्मगान्धिचरितम् महाकाव्यातील ऋतुवर्णन | अश्विनी म.जोशी<br>अनिरुध्द अ. मंडलिक | २५ |
| ६ | गौरी देशपांडे यांच्या कथांमधील स्त्री | प्रा.डॉ. शकुंतला एम.भारंबे | ३१ |
| ७ | संत साहित्य, महानुभव साहित्य व दलित साहित्य चळवळ यांचा परस्परसंबंध | प्रा. रामकिशन दहिफळे | ३५ |
| ८ | लोकवाङमयातील स्त्री गीतांचे वेगळेपण | प्रा.डॉ.हनुमंत तुकाराम माने | ३८ |
| ९ | संत चोखामेळा-एक चिंतन | डॉ.मेधा गोसावी | ४३ |
| १० | पद्मविभुषण गोविंदभाई श्रॉफ यांच्या जिवन व कार्याचे अध्ययन | श्री. दिपक दिनकर नागरे | ४६ |
| ११ | रामदास बयाजी दळवी पाटील यांचे छत्रपती संभाजी गीता म्हणजे शब्दांचा रत्नहार | प्रा.डॉ.विजय पाटील | ४९ |
| १२ | महावीर गोंधळे यांचे हिरव्या डहाळ्या करवंदी आभाळ या ललित संग्रहातील निसर्ग सौंदर्य व ग्रामीण जीवन. | प्रा. डॉ. र. तु. देशमुख | ५२ |
| १३ | हैदराबाद संस्थानातील शैक्षणिक स्थितीचे अवलोकन | श्री. दिपक दिनकर नागरे | ५४ |
| १४ | इ.स. १९८० नंतरची दलित | प्रा.डॉ.गिते लक्ष्मण बलभीम | ५७ |
| १५ | साहित्यनिर्मितीस सांस्कृतिक व सामाजिक मुल्यांचे योगदान | प्रा.क्षीरसागर प्रशांत बब्रुवान | ६० |
| १६ | जी.ए.कुलकर्णी यांच्या कथेतील 'रत्न' प्रतिमा | डॉ.एम.ए.कव्हळे | ६३ |
| १७ | यू.म. पठाण यांचे ललित साहित्यातील अनुभवविश्व | प्रा.रामलीला सुदामराव पवार | ६७ |
| १८ | ग्रामीण कादंबरीतून घडणारे राजकारणी व्यक्तींचे दर्शन | दया जेठे | ७२ |
| १९ | जागतिकिकरणाचा मराठी भाषेवरील परिणाम: एक अभ्यास | प्रा.डॉ.गिते लक्ष्मण बलभीम | ७५ |
| २० | मानवतेचे मंगलमय स्वप्न पाहणारे काव्य : 'नागफणा आणि सूर्य' | डॉ. विद्या प्र. जाधव | ७७ |
| २१ | साहित्याची सामाजिकता | डॉ.राजाराम अं.झोडगे | ८१ |

# जी.ए.कुलकर्णी यांच्या कथेतील 'रत्न' प्रतिमा

**डॉ.एम.ए.कव्हळे**
मराठी विभाग,
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव

कथाकार जी. ए. कुलकर्णी यांच्या कथांमध्ये येणारी रत्न ही महत्त्वपूर्ण आदिप्रतिमा आहे. ही आदिप्रतिमा स्वात्मरुपाच्या आदिबंधाची आविष्कारक आहे. रत्न ही प्रतिमा जीवनासक्तीचे प्रतीक असून त्यातून पूर्णत्वाचे, साकल्याचे सूचन होत असते. व्यक्तीला जीवन जगताना आणि स्वात्मसाधनेच्या प्रवासामध्ये अंतिम टप्प्यावर अंतिम ज्ञानाची जी प्राप्ती होते, त्याचे प्रतिक म्हणून रत्न ही प्रतिमा साहित्यातून आविष्कृत होताना दिसते. जी. ए. कुलकर्णी यांच्या समग्र कथासाहित्यात रत्न ही आदिप्रतिमा अतिशय मोजक्या कथांमध्यें आलेली आहे. 'रत्न', 'प्रवासी' आणि 'इस्किलार' या कथांमध्ये कथानायकाला रत्नलाभ झाल्याचे दिसते. या तीन कथांमधील रत्नप्राप्ती ही वेगवेगळ्या स्वरुपाची आहे. त्याविषयी सूक्ष्म विचार केल्यास त्याचा प्रत्यय येऊ शकतो.

'रत्न' ही कथा 'काजळमाया' या कथासंग्रहातील असून या कथेतील प्रवासी नायक रत्नाच्या शोधासाठी निघाला आहे. हा प्रवासी म्हणजे दीन, गरीब, संपत्तीहीन आहे असे नाही. तो एका ग्रामप्रमुखाचा मुलगा आहे. हत्तीच्या पायांना सोन्याचे तोडे घालीन अशा धनाढ्य व्यक्तीचा तो मुलगा आहे. पण या प्रवाशाच्या हट्टापुढे सर्वांचा निरूपाय झाला आहे. अनेक रत्ने वडीलांनी त्याच्यासाठी आणली पण नजरेसमोर रत्न धरलं की त्यातील तेजामुळे आपलं सारं अंतरंगही उजळून निघालं पाहिजे असा त्याचा आग्रह आहे. त्याच्या हट्टामुळे पित्यानेच त्याला नगरातून हाकलून देण्याची आज्ञा दिली आहे. जीवनाचे अंतिम सत्य असे स्वतःलाच शोधायचे असते. हे सत्य दुसरा सांगू शकत नाही. या न्यायाने त्यानेही घर सोडले आहे. अंतिम ज्ञानाच्या शोधार्थ तो निघाला आहे.

या कथेतील प्रवाशी सर्व जगाचा प्रवास करतो पण अंतिम ज्ञानाचे प्रतीक असलेले रत्न त्याला सापडत नाही. अनेक रत्ने त्याला सापडतात आणि निराशेने त्याने भिरकावलेली असतात. हा प्रवाशी एका अतिप्राचीन जीर्ण मंदिरामध्ये प्रवेश करतो. या ठिकाणी तो निराश झाला आहे. जीवनाच्या प्रवासात ध्येयप्राप्तीसाठी आयुष्य झिजवूनही रत्नप्राप्ती न झाल्याने या जगामध्येच रत्न नसले पाहिजे असा भ्रम त्याला झाला आहे. अशावेळी एक वृद्ध स्त्री त्याला रत्नप्राप्तीच्या मार्गाचे मार्गदर्शन करते. त्या बदल्यामध्ये त्याच्याकडून सर्व शारीरिक, ईर्ष्येची दृढता त्याच्याकडून घेते. पुढे त्याला कृष्णगरुड भेटतो. तो रत्नमार्ग दाखवण्यासाठी त्याचे सर्व रक्त त्याच्याकडून घेतो आणि शेवटी त्याला अपेक्षित रत्नाचा लाभ होतो. जीवनातील अंतिम सत्याच्या उलगड्यासाठी आशा ओसरावी लागते. ध्येयप्राप्तीची आशा आणि गरज संपल्याशिवाय अंतिम ज्ञानाचे दर्शन होणे अशक्य असते. विजयाची आस धरुन लढाई केल्यास पराजयाची भीती असते. पण विजयाची आसच नसेल तर पराजय होणारच नाही आणि पराभवाने अवमानही होणार नाही. आत्मज्ञान आणि स्वात्मरुपही ईर्ष्येने हस्तगत करता येत नसते. अशीच स्थिती या प्रवाशाची आहे. रत्नलाभाच्या सर्व आशा संपुष्टात आल्यानंतर त्याला रत्नलाभ होतो आणि त्याचा लौकिक जीवनासाठी कोणताच उपयोग नसतो कारण अंतिम ज्ञानाबरोबरच त्याचे जीवनही संपुष्टात येते. मानवी जीवनाची ही शोकांतिका आहे.

या कथेमधील रत्न हा मानवी जीवनाच्या अंतिम ज्ञानाचे प्रतीक आहे. हा रत्न कसा आहे तर "तुला हवं असलेलं रत्न काही मानवांना प्राप्त झालेलं मी पाहिलं आहे. ते रत्न त्रिनेत्री असून अनंतरंगी आहे. त्याच्या एका कक्षेत चंदनाचा गंध असलेल्या चंद्रिकेची शीतलता आहे, तर दुसऱ्या कक्षेत आदिसूर्याच्या प्रखर तेजाची तप्तता आहे. असं त्याचं एका यांत्रीकानं

वर्णन केलं, परंतु हा अभेद्य पर्वत ओलांडून गेल्याखेरीज तुला त्याचा स्पर्श लाभणार नाही."[१] येथील पर्वत हा मृत्यूचे प्रतीक वाटतो. मृत्यूच्या पलिकडेच जीवनाचे अंतिम ज्ञान असल्याचे आणि नियतीसमोर मानव हतबल असल्याचे कथाकारांना सूचवायचे आहे. प्रवाशाला जीवनासक्तीतून रत्न मिळविण्यासाठी प्रेरणा मिळते. परतु स्वत:च्या दृष्टीमध्ये घडू आलेलं एक परिवर्तन एवढाच रत्नप्राप्तीचा सत्यार्थ असतो. "पुन्हा सारं तेच! अखेर आपणाला रत्नप्राप्ती झाली या भ्रमानं आणखी एका आयुष्याला विराम मिळाला! कृष्णगरुडा, सावधदृष्टीनं पाहा. याची ओंजळ ज्याप्रमाणं रिकामी आहे त्याप्रमाणं इथल्या कोणत्याच आकृतीवर एकही रत्न नाही. तरी या मानवाला रत्नप्राप्तीचा हर्ष झाला आहे. ही रत्नप्राप्ती म्हणजे अंकुर स्वत:च्या दृष्टीमध्ये घडून आलेलं एक परिवर्तन, एवढाच त्याचा सत्यार्थ आहे."[२] पण शेवटी भ्रमामध्ये का असेना आपल्याच स्वात्मरुप मिळाल्याचा आनंद त्या मूर्त प्रवाशाच्या चेहऱ्यावर आहे. जन्मभर ध्येयप्राप्तीसाठी, अंतिम ज्ञानाच्या प्राप्तीसाठी केलेल्या श्रमाचा अंत शेवटी भ्रमाने होतो.

कथाकार जी. ए. कुलकर्णी यांना मानव आणि नियती यांच्यामध्ये शेवटी नियतीचाच विजय होतो हे सूचित करायचे आहे. या प्रवाशाचे जीवन नियतीने बांधलेले आहे. त्याचप्रमाणे या जगातील प्रत्येक मानवाचे जीवन आणि वर्तन नियतीच निश्चित करताना दिसते. त्यामुळे रत्नप्राप्ती होऊनही त्याचे जीवन म्हणजे नियतीचा एक खेळ ठरतो. त्याने केलेले श्रम, धडपड ही नियतीने अगोदरच निश्चित केलेली दिसते. म्हणून नियती, निसर्ग मानवाला जीवनाच्या अंतिम ज्ञानापर्यंत नेते पण त्यावेळी त्याचे जीवन संपलेले असते. प्रवाशाला हवे असलेले सहस्त्ररंगी रत्न त्याच्याच हृदयामध्ये असते पण त्याच्या प्राप्तीसाठी तो संपूर्ण जगभर भटकतो, मानवाच्या बाबतीत अंतिम सत्य हेच दिसते.

जी. ए. कुलकर्णी यांच्या 'रमणखुणा' या कथासंग्रहामध्ये 'इस्किलार' नावाची दीर्घकथा आहे. या कथेमध्ये लाल रत्नाची प्रतिमा आलेली आहे. या कथेचा नायकही एक प्रवासी आहे. पण याठिकाणी तो रत्नप्राप्तीसाठी प्रवासाला निघालेला नाही. लाल रत्न हा त्याच्या प्रवासातील अंतिम अटळ टप्पा आहे. त्यामुळे 'इस्किलार' मधील लाल रत्न ही आदिबंधात्मक प्रतिमा जीवनाच्या अंतिम ज्ञानाचे प्रतीक ठरत नाही. तर जीवनोत्सुकतेचे प्रतीक ठरते. या कथेतील प्रवाशी वीरनायक आहे. तो त्याच्या अटळ भविष्याशी संघर्ष करत प्रवास करत आहे. हा प्रवास करण्यासाठी नियतीनेच त्याला प्रवृत्त केले आहे. हा त्याचा प्रवास नियतीचे अटळ प्राक्तन आहे. या वीरनायकाला आपल्या भविष्याचा शोध घ्यावयाचा आहे. त्याच्या हाती या जीवनरहस्याच्या शोधासाठी 'सेरिपि इस्कहार एली' एवढाच तपशील आहे. त्यामुळे हा प्रवाशी नदीकाठच्या मंदिरामध्ये आला, त्या परिसरात वावरत आहे. या प्रवाशाच्या आईचा मृत्यू त्याच्या जन्माच्या वेळी झालेला असून त्याच्या वडिलांनी भविष्यातील अटळ धोका टाळण्यासाठी त्याचा त्याग केला आहे. या प्रवाशाला प्रथम गारुडी भेटतो हा गारुडी सामान्य नियतीशरण माणसांचा प्रतिनिधी आहे. त्यानंतर त्याला भेटणारा याकीर हा कट्यारच्या दुकानाचा तरूण मालक आहे. याकीरच त्याला एका अंगठीच्या मोबदल्यामध्ये 'सेरिपी' म्हणजे कट्यार देतो. त्याच्या जीवनरहस्याच्या शोधामधील सेरिपीचा अर्थ प्रवाशाच्या हाती लागतो. त्यानंतर प्रवाशी मद्यागारामध्ये प्रवेश करतो. त्याठिकाणी मद्याच्या आहारी न जाता त्याला इस्कहार म्हणजे लाल रत्न हाती लागतो.

मद्यागारातून बाहेर पडल्यानंतर त्याला गुलामाचा व्यापारी भेटतो. त्यानंतर अनिस नावाचा कोवळा मुलगा भेटणे ही घटना महत्त्वाची आहे. हा अनिस त्याला स्वत:च्या बापाचे जीवन आणि मरण याची कथा सांगतो आणि त्याचबरोबर एली म्हणजे वसंतऋतू या त्याच्या रहस्यमंत्रातल्या अखेरच्या शब्दाचा उलगडाही करून सांगतो. आता या प्रवाशाचा हातामध्ये रहस्यमंत्राचा अर्थ आला आहे. कट्यार, लाल रत्न आणि वसंत ऋतू या तीन शब्दांचा जीवनातील अर्थ त्याला लावता येत नाही. अशा वेळी त्याला जीवनामध्ये अनिमाचे ऋणात्मक रुप असलेली अल्थिया भेटते. तिचे पत्र मंदिरामध्ये नेऊन पोहोचविण्याची जबाबदारी त्याच्यावर येते. हे पत्र मंदिरातील सेविकेला एलीला पोचविण्यामागे त्याचे कोणतेच प्रयोजन नाही पण तरीही नियतीच्या अटळ प्राक्तनाप्रमाणे तो ही जबाबदारी स्वीकारतो. राजकन्या एलीला हे पत्र देताच तिच्या सुटकेची वार्ता तिला

समजते. पण त्याचवेळी प्रवाशाची नजर तिच्या गळ्यातील लाल रत्नावर पडते. त्यामुळे तो मोहवश होऊन रत्न घेण्याचा यत्न करतो. एलिने विरोध केल्यामुळे सेरिपी म्हणजे कट्यार तिच्या कंठावर ठेवतो आणि त्यातच तिचा अंत होतो. त्याचे डिल धीवर या कृत्यापासून त्याला परावृत्त करण्यास असमर्थ ठरतात आणि यावेळी त्याला जीवनरहस्याचा शोध लागतो. कन्या एली ही त्याची बहिण असते आणि तिचा आणि वडिलाचा मृत्यू या वीरनायकाच्या हाताने होणार हे प्राक्तन म्हणजे रिपी इस्कहार एली' असते.

या कथेमधील 'इस्कहार' म्हणजे लाल रत्न हा प्रवाशाच्या जीवनरहस्य शोधण्याच्या अंतिम टप्प्यावर येणारे प्रतीक आहे. लाल रत्न त्याच्या जीवन रहस्याचा अपरिहार्य घटक आहे. प्रवासाच्या अंतापर्यंत त्याच्या भविष्याचा अर्थ त्याच्या हाती लागत नाही. जीवनरहस्याचा उलगडा करण्यासाठी हा लाल रत्न मिळविताना आपण एलीच्या मृत्यूला कारण होत आहोत याचे भानही नायकाला राहत नाही. या रत्नाचा रंग लाल आहे म्हणजेच मृत्यूचे प्रतीक आहे. या रत्नालाभासाठी प्रवाशी स्वतःच्या बहिणीला मारत असला तरी ते त्याचे अटळ प्राक्तन आहे. नियतीनेच प्रवाशाला त्याच्या आई आणि बहिणीच्या मृत्यूच्या कारणासाठी निर्माण केले आहे. धीवर हे नियतीविधान खोटे ठरविण्याची निष्क्रीय धडपड करतो. पण त्याचा उपयोग नसतो. नियती आणि मानव यांच्या संघर्षामध्ये नियती मानवावर विजय मिळविणार हे जीवनाचे अंतिम वास्तव आहे. येथे स्वात्मविकासाच्या प्रवासातील अंतिम टप्पा स्वात्मरुपाची प्राप्ती याचे प्रतीक म्हणून लाल रत्न न येता जीवनाच्या अंतिम सत्याकडे नेणारा हा लाल रत्न आहे. प्रवाशाला जीवनाचे अंतिम सत्य, त्याच्या जीवनरहस्याचा शोध लाल रत्नाच्या लाभाशिवाय होणे शक्य नाही म्हणून लाल रत्न ही आदिप्रतिमा स्वात्मरुपाचे प्रतीक न ठरता जीवनरहस्याच्या उलघड्याचे कारण ठरतो.

'रमलखुणा' या कथासंग्रहातील दुसरी कथा 'प्रवासी' ही अशाच प्रकारच्या एका प्रवाशाची कथा आहे. या कथेच्या सुरुवातीलाच प्रवाशाला रुद्रकालीच्या मंदिरात हिरवा रत्न प्राप्त होतो. हा प्रवाशी बऱ्याच काळापासून प्रवास करत आहे. त्याच्या जीवनाच्या आणि जगण्याच्या संकल्पना स्पष्ट आहेत. त्याला जीवनाविषयी लालसा आहे. लौकिक अर्थाने मजेशीर जीवन जगण्याच्या इर्ष्येने तो धनप्राप्तीची इच्छा मनात ठेऊन जगतो आहे. एका नाविकाने त्याचा प्रवास त्या रूद्रकालीच्या मंदिराकडे वळवला आहे. त्यानेच या प्रवाशाला रुद्रकालीच्या मंदिराविषयी आणि त्यातील हिरव्या रत्नाविषयी माहिती दिली आहे. हा प्रवाशी या मंदिरात येतो. त्या हिरव्या रत्नावर त्याची दृष्टी पडताच त्याच्यातील लालसा जागी होते. लालसेने तो रत्न घेण्याचा प्रयत्न करतो. पण रत्न सहज हाती न आल्याने रुद्रकालीच्या मुर्तीवर प्रहार करून ते मिळवितो. या हिरव्या रत्नाच्या प्राप्तीनंतर त्याठिकाणी आलेल्या वधकाला तो पराभूत करतो. त्यावर त्याच्याच शस्त्राने म्हणजे फरशीने प्रहार करुन रत्न घेऊन पुन्हा नावेत बसतो. यावेळी नाविक न दिसल्याने स्वतःच नाव चालवत पुढे प्रवास करतो.

हिरव्या रत्नाच्या प्राप्तीनंतरचा प्रवाशाचा प्रवास निश्चित नाही. या प्रवासात त्याला आपल्याच पत्नीच्या चितेवर गोळे भाजणारा बैरागी भेटतो. तो अनेक कथा त्याला सांगतो. त्यानंतर जटाधारी प्रवासी जो गीतकार असतो त्याची भेट होते. त्यावेळी त्याला प्रवासामध्ये एक कुत्र्याचे पिल्लू भेटते. त्याला घेऊन प्रवासी प्रवास करतो. पुढे आंधळ्या शिकाऱ्याच्या जाळ्यात तो अडकतो पण कुत्र्याच्या बलिदानामुळे त्याची सुटका होते. या हिरव्या रत्नामुळे प्रवाशाचा प्रवास सुरु झाला आहे. हा प्रवास प्रवाशाने निश्चित केलेला नाही तर नियतीने निश्चित केलेला आहे. जसा या प्रवाशाचा प्रवास निश्चित आहे तसाच त्याच्या संपर्कात येणाऱ्या सर्वांचाच आहे. या ठिकाणी प्रवाशाला मिळालेले रत्न त्याच्या संज्ञाकंदाचे प्रतीक ठरत नाही. मिळालेले रत्न विकून वैभवात जीवन जगण्याची त्याची इच्छा आहे. या दृष्टीने त्याचा बैराग्याशी झालेला संवाद महत्त्वाचा आहे. "प्रवासी किंचित हसला आणि म्हणाला, "नको. माझा मार्ग कुंपणाच्या दुसऱ्या बाजूचा आहे. मला आयुष्याविषयी आसक्ती आहे. लाल रंगाचे मद्य, युवतींचा शृंगार, सजवलेले प्रसाद यांचा पुर्ण उपभोग मला हवा आहे. स्वच्छ निळ्या पाण्यात माझी हंसाकृती नौका डौलानं चालली आहे व माझे सेवक शुभ्र वल्ही लयबद्ध तऱ्हेनं हलवत आहेत,

माझे देखणे, विजेत कोरल्याप्रमाणे दिसणारे घोडे जमीनीला नाममात्र स्पर्श करत लाटांप्रमाणे आयाळ उडवत वाऱ्यासारखे धावत आहेत, असलं वैभव मला हवं आहे. सर्व स्त्रीया अंधारात सारख्याच असतील पण प्रत्येक भोगक्षण मात्र अद्वितीय असतो. असले अनंत अनुभव मला आयुष्यात वेचायचे आहेत.''[३] ही प्रवाशाची सुरुवातीची अवस्था आहे. शेवटी एका नगरामध्ये या प्रवाशाचा प्रवेश होतो. हे नगर महाकाल आणि अकाल या दोन भावांच्या इशाऱ्यावर चालते. तेथे एक वृद्ध म्हातारा त्याला नगराविषयी माहिती देतो. नगरामध्ये प्रवेश केल्यानंतर त्याला माणसाचे खरे रुप समजते. एक कुटुंब या नगरातून आपली सुटका करुन घेण्यासाठी कशाप्रकारे एकमेकांचे बळी देण्यास तयार होते. हे पाहून त्याची वैभवात जगण्याची इच्छाच मरून जाते. हिरवा रत्न प्राप्तीने त्याचा प्रवास निश्चित होतो आणि हिरव्या रत्नाच्या दुराव्याने त्याला जीवनाचे अंतिम सत्य कळते. त्यामुळे या कथेतील हिरवा रत्न स्वात्मरुपाचे प्रतीक ठरत नाही. तर जीवनासक्तीचे कारण ठरते. प्रवाशाच्या बाबतीत मृत्यूसमयी ज्ञानाच्या प्राप्तीनंतर त्याचा प्रवास पुढे चालणार आहे. ज्या जीवनासक्तीने त्याचा प्रवास निश्चित केलेला होता ती जीवनासक्ती त्याच्यातून संपून गेली आहे. म्हणजेच हिरव्या रत्नाच्या जाण्याचा संबंध त्याच्यातील इच्छा, आकांक्षा संपण्याशी लावता येणे शक्य आहे. महाकालच्या लेखी स्वतःच्या लहानपणाची जाणीव होणं म्हणजेच स्वतःचे रुप ओळखणे होय. या प्रवाशाला स्वतःच्या खऱ्या रुपाची जाणीव झाली आहे. ती या हिरव्या रत्नामुळे. त्याच्या प्राप्तीमुळे आणि त्याच्या जाण्याने प्रवाशाला जीवनाचे अंतिम ज्ञान प्राप्त झाले आहे. हे नियतीचे जगण्याचे सूत्र या प्रतिमाद्वारे सूचित झालेले दिसते.

कथाकार जी. ए. कुलकर्णी यांच्या कथेमध्ये रत्न ही आदिप्रतिमा विविध गोष्टीचे सूचन करण्यासाठी येते. 'रत्न' कथेतील सहस्त्ररंगी रत्न नायकाच्या संज्ञाकंदाचे, जीवनाच्या अंतिम ज्ञानाचे प्रतीक आहे. तर 'इस्किलार' मधील लाल रत्न प्रवाशाच्या जीवनरहस्याच्या उलगड्याचे कारण ठरते. या लाल रत्नाच्या दर्शनाने त्याच्यातील बौद्धीक शक्ती नाहीशी होऊन त्यांच्याकडून नियतीलिखित कार्य पूर्ण करून घेतले जाते. 'प्रवाशी' कथेतील हिरवे रत्न प्रवाशाचा प्रवास निश्चित करते. इतर दोन कथेप्रमाणे हे रत्न प्रवाशाला शेवटच्या क्षणी न मिळता सुरूवातीलाच प्राप्त होते. जोपर्यंत हे हिरवे रत्न जवळ आहे तोपर्यंत त्याला जगण्याची ओढ असते. शेवटी जीवनातील निरर्थकता कळाल्यावर हे रत्न तो अकालासाठी देऊन टाकतो. हे रत्न प्रवाशाच्या जीवनासक्तीचे प्रतीक आहे. अपेक्षा ठेऊन जीवनाच्या अंतिम सत्याचा उलगडा होत नाही. नियती आणि मानव यांच्या संघर्षात शेवटी मानवाच्या अंतिम सत्याचा उलगडा होत नाही. नियती आणि मानव यांच्या संघर्षात शेवटी मानवाचा पराजय होतो, नव्हे नियतीच मानवाचा खेळ करते. या तीनही कथेमधील प्रवाशांचा प्रवास हा नियतीचेच रुप ठरते. रत्नप्राप्ती होऊनही या तीन प्रवाशांना कोणताच लाभ होत नाही. म्हणूनच नियतीशरणता तीनही कथांचा शेवट ठरला आहे.

**संदर्भ :**


१. काजळमाया, जी.ए.कुलकर्णी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, सातवी आवृत्ती. २००९, पृष्ठ.२२९

२. तत्रैव, पृष्ठ. २४१

३. रमलखुणा, जी.ए.कुलकर्णी, पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पाचवी आवृत्ती, २००९, पृष्ठ.१२

Printing Area
UGC
Jr.No.43053
UGC Approved Refereed Journal

ISSN 2394-5303

# printing™ AREA

Issue-37, Vol-06,
January-2018

International Multilingual Research Journal



Editor
Dr.Bapu G.Gholap

14) A Study on Awareness of E-Banking Services InCollege Students of Gadhada,....
**Mori Hitesh Laljibhai, Dist. Botad** || 64

15) Evaluation of Digital library: Context among science and technology
**Dr. Bhavina Naik** || 68

16) North-west corner method for solving transportation problem
**Dr. Brajendra Tiwari—Aarti Borasi, M.P.** || 72

17) A QUANTITATIVE STUDY BASED ON PUBLIC SPEAKING ANXIETY IN BENGALI....
**RITWIK SAHA, WEST BENGAL** || 76

18) Mental & Psychological Health Issues among Elderly People
**Aditi Srivastava, Bhopal** || 81

19) The Emergence of E-mentoring in Development of Skilled Human Resources
**Preeti Singh, DehmiKalan, Rajasthan** || 83

20) Reinterpreting Soyinkan Women: Rola In A Dance Of The Forests
**Bhumika Abrol, Kakriyal, Katra** || 90

21) DEPRESSION AMONG ADOLESCENTS IN INDIA: SOME INSIGHTS
**Dr. K. Mary Sujatha—Mr.B. S. N. Prasad—Mr. T. Deepak R. Kiran** || 96

22) A STUDY ON WORKING CAPITAL MANAGEMENT OF TATA CHEMICAL LIMITED
**Jaydev M. Vithlani, Anand (Gujarat)** || 100

23) 'कोंडुरा' कादंबरीची आदिबंधात्मक चिकित्सा
**डॉ.एम.ए.कव्हळे, माजलगाव** || 104

24) वि.स. खांडेकरांच्या कांदबऱ्यातुन आलेले स्त्री-पुरुष प्रेम भावनेचे चित्रण
**डॉ. प्रल्हाद होंडे, घनसावंगी जि. जालना** || 107

25) अमळनेर तालुक्यातील संत सखाराम महाराजांचा रथोत्सव
**प्रा. डॉ. सुनिल सी. अमृतकर-प्रा. मनिष आर. करंजे** || 110

26) आण्विक दहशतवाद व सुरक्षा
**प्रा.दिपकराव बाबुराव देवरे, चोपडा जि.जळगाव** || 113

www.vidyawarta.com/03 | http://www.printingarea.blogspot.com

**23**

# ‘कोंडुरा’ कादंबरीची आदिबंधात्मक चिकित्सा

डॉ.एम.ए.कव्हळे
मराठी विभाग,
[illegible]

***********

चिं. त्र्यं. खानोलकर यांची ‘कोंडुरा’ ही कादंबरी अतिशय गाजलेली कादंबरी आहे. पर्शरामतात्या नावाच्या माणसाची आणि त्याने स्वीकारलेल्या विकृतीची ही कथा आहे. कोंडुऱ्याच्या प्रभावाखाली वावरणाऱ्या प्रांतातील लोकमानसाची, कोंडुऱ्याविषयीच्या आदिम श्रद्धांची ही कथा आहे. कोंडुऱ्याच्या प्रभावाखाली वावरणारे येथील अनेक गावे, कोंडुऱ्याविषयीच्या त्यांच्या मनातील अनेक समजूती आणि त्यांच्या मनावरील कोंडुऱ्याच्या प्रभावाचा फायदा उचलणारे पर्शरामतात्या आणि नारोबा जड्ये यांचे अतिशय सुंदर चित्रण कादंबरीमध्ये आले आहे.

कोंडुरा म्हणजे एक तुटलेला कडा असून त्याच्या पायाशी मोठं विवर आहे. या काळोखी विवरामध्ये समुद्राच्या लाटा आदळतात आणि त्याच्या आवाज होतो. या निसर्गातील बाबींबद्दल मानवी मन विस्मयचकित होऊन त्याची पूजा करते आहे. हा कोंडुरा परिसरासाठी कडा राहिलेला नसून देव झाला आहे. कादंबरीच्या सुरुवातीलाच कोंडुऱ्याविषयीची जनभावना सांगताना कादंबरीकार लिहितो. “कोंडुरा हा आसमंतातील गावांचा ‘देव’ बनून गेलाय. कोंडुरा हे लोकांचं दैवत. तुटलेल्या कड्याच्या टोकाशी माणसे उभी राहतात आणि नवस बोलतात. पान, फुल, पाणी, गंधाक्षता, नारळ -जे जे काय शक्य असेल ते ते त्या खालच्या रहस्यात फेकतात. त्याचं काय होत कोण जाणे! पण त्या कड्याच्या टोकाशी उभं राहणं ही सुद्धा एक कर्तबगारीच आहे. तिथ उभं राहिलं की डोळे फिरायची वेळ येते. ‘आ’ वासलेली पोकळीच होते माणसाच्या अस्तित्वाची. माणूस तांदळाच्या कणासारखं कड्यावरून उडून जातं की काय अस वाटतं. पण कोंडुऱ्याच्या तुटलेल्या कड्यावर माणूस अगदी घरच्या उंबऱ्यावर उभं राहावं तसं निश्चितपणे उभं राहतं कानातल्या बहिरेपणा काढून घेणारी खालची गर्जना ऐकत राहतं आणि आपली साकडी कोंडुऱ्याला घालतं. आपापले नवस निर्धास्तपणे बोलतं. माणसाची आपली पिढ्यानपिढ्यांची कल्पना आहे. त्या विवरात एक हजारो वर्षांचं म्हातारं कासव आहे. आणि त्याच्या पाठीवर एक त्याच्याहूनही म्हातारा यती बसलाय. संपूर्ण पिकलेला. या पृथ्वीचा आदिअंत त्याला माहीत आहे. त्याच्या मिटलेल्या डोळ्यापुढच्या भिंगासारख्या जगाशी त्याला कसलंच कर्तव्य नसलं तरी हे भिंग फुटू नये याचीही काळजी तो घेत असतो. प्रत्येकाचीच माती त्याच्या हिशेबी जमा होते. ह्या मातीच्या पापपुण्याची नोंद त्याच्यापाशी असते. पण तोही त्या कासवाच्या कवचासारखाच कोरडा राहिलाय. सगळ्या जगाची सूत्रं हाती ठेवणाऱ्या परमेश्वराशी त्याचं नातं आहे. कुरुक्षेत्रावर पांडवाशी लढलेल्या आणि डोक्याला मणी हरवून बसलेल्या चिरंजीव वेदनेशी - अश्वत्थाम्याशी त्याचा परिचय आहे. कधीकधी अश्वत्थामाही त्या विवरात येतो. कोंडुऱ्याशी तेल अशी आरोळी देतो आणि तो येऊन गेल्याची खूण म्हणजे त्या कोंडुयाशी आकांत करणाऱ्या लाटालाटांवर तरंगणारा तेलकट तवंग माणसांना तेलतवंग दिसला की ती चुकचुकतात. स्वतःशीच म्हणतात, “भटकतोय बापडा” आणि त्याच वेळी त्यांना कोंडुऱ्याबद्दल अधिकच आपुलकी वाटते. त्याच्या डोळ्यात मृत्यू, आपलं सगळंच काही, आपलं भवितव्य या कोंडुऱ्याच्या पोलादी मुठीत अगदी सुरक्षित आहे.”[१] यावरून कोंडुऱ्याचा आजूबाजूच्या परिसरावरील प्रभाव लक्षात येतो. या कोंडुऱ्याच्या प्रभावाबद्दल विचार केल्यास आदिमानवाच्या सृष्टीबद्दलच्या आकलनाचा हा परिपाक वाटतो. प्रथम माणसाने जेव्हा निसर्गाकडे आपल्या अल्पबुद्धीने आणि अल्प ज्ञानाने पाहिले तेव्हा सृष्टीमधील विविध घटकांना त्याने नावे दिली, त्यांच्याविषयीच्या कथा तयार केल्या. आजच्या निसर्गातील प्रभावामागे आदिम मानवी मनच कारणीभूत आहे. कोंडुऱ्याची निर्मितीही अशाच आदिम मनाची निर्मिती असली पाहिजे. पुढे मानवी उत्क्रांतीच्या काळात या कल्पना अवशेषरुपाने मानवाच्या पुढील पिढ्यानी स्वीकारल्या; म्हणून जवळपासच्या गावांचा कोंडुरा हा देव बनला.

कोंडुऱ्याविषयी असलेली मानवी मनातील हीच संकल्पना कादंबरीमध्ये येते आणि त्यामुळेच कादंबरी घडत जाते. ती म्हणजे जवळपासच्या गावावर आणि गावातील प्रत्येक क्रियेवर कोंडुऱ्याचे नियंत्रण आहे, कोंडुऱ्याच्या आदेशानेच जवळपासची मानवी संस्कृती उभी आहे आणि यावर सर्व लोकांचा विश्वास आहे. लोकमानसावर असलेला कोंडुऱ्याचा हा प्रभाव खरा किंवा खोटा याचा विचार परिसरातील माणसे कधीच करू शकत नाहीत. आदिमानवाच्या आकलनातून निर्माण झालेली अशी दैवते अनेक भागामध्ये स्वीकारली जातात आणि त्याविषयी शंका उपस्थिती करणे पाप समजले जाते. त्यामुळे कोंडुऱ्याच्या प्रभावाविषयी शंका उपस्थित

होणे शक्य नाही. परिसरातील लोकांनी त्यांच्या मनाने त्याच्या प्रभावाचा स्वीकार केला आहे.

कादंबरीचा नायक पर्शरामतात्या आणि त्याच्या घरातील व्यक्तीवरही कोंडुऱ्याचा हा दैवी प्रभाव आहे. त्यामुळे घरातील माणसाची पर्शरामतात्याविषयीची भावना बदलते आणि त्यांची पुजा सर्वजण करताना दिसतात. पर्शरामतात्या घर सोडून निघाले आहेत. आपल्या भावाने विष्णूदादाने पत्नीकडे जाण्याची वाट अडविल्याने तात्याने मुंबईची वाट धरली आहे. मानवी लैंगिक प्रवृत्तीला दिलेल्या छेदामुळे पर्शरामतात्या रागाने घर सोडतात. भावाच्या टोमण्यामुळे पर्शरामतात्याची पुढील जगण्याची दिशा यती निश्चित करतो. पण कार्ल युंगच्या मते वृद्ध आप्त म्हणजे आपल्याच मानसशक्तीचे प्रतीक असते. विष्णूदादाच्या टोमण्यामुळे पर्शरामतात्या घराबाहेर पडतात पण विष्णुदादा आणि घरातील लोकांचा सुड उगविण्यासाठी त्यांच्या मानसशक्ती कार्यान्वित होतात. या कार्यान्वित झालेल्या मानसशक्तीचे रूप म्हणजे यती होय. घरातील लोकांनी आपणास न अडविल्याचा आणि विष्णूदादा विषयीचा राग म्हणून तात्याने यतीच्या रुपाने आपल्या जीवनाची पुढील आखणी केली आहे. पर्शरामतात्याला यतीने दिलेली गर्भ जिरविण्याची मुळी म्हणजेच त्यांच्या मानसशक्तीमधून आलेली विकृती होय. ब्रह्मचर्य पालनाची विकृती पर्शरामतात्याने अशीच स्वीकारली आहे. म्हणजे तात्यांना कोणताही यती भेटलेला नाही. पर्शरामतात्या कोंडुऱ्याजवळ आल्यावर त्याच्या मनाने घरातील मंडळीवर सूड उगविण्यासाठी ब्रह्मचर्य पालनाची विकृती स्वीकारली आहे आणि पर्शराम तात्या घरी परत आले आहेत.

पर्शरामतात्या हा सर्वसामान्य माणूस आहे. त्याने ब्रह्मचर्य पाळण्याची आणि आपणास कोंडुऱ्याचा आदेश झाल्याची विकृती स्वीकारली असली तरी सुरुवातीच्या काळात ही विकृती स्वीकारावी की फेकून द्यावी, असे त्याच्या मनात द्वंद्व चालू आहे. त्याचेच प्रतीक म्हणून कादंबरीमध्ये विहीर येते. वेळ जाण्यासाठी पर्शरामतात्याने विहीर खणण्यासाठी घेतली आहे. कोंडुऱ्यापासून परत आल्यानंतर ते अनसूयेकडे म्हणजे आपल्या बायकोकडे गेले नाहीत. त्यांनी कोंडुऱ्याची आज्ञा झाल्याची आणि ब्रह्मचर्य पालनाची गोष्ट कुणालाच सांगितलेली नाही. ही विकृती फेकून द्यावी असे त्याच्या मनात बऱ्याच वेळा येते. विहीर खणण्याच्या प्रतीकामधून ते स्पष्ट होत जाते. गावातील लोक विहिर खणण्यासाठी आले आहेत. शिवा धनगराने पंचवीस हातावर पाणी असल्याचे सांगीतले आहे. या शिवा धनगराला कोंडुऱ्याचा आशीर्वाद असून त्याला पाणी कळते असे सर्व परिसरात मानले जाते. पर्शरामतात्यांना मात्र त्याचे पाणी असल्याचे विधान असत्य ठरावे असे वाटते. याचे कारण असे की शिवा धनगराचे विधान खोटे ठरल्यास तात्यानाही स्वीकारलेली विकृती फेकून देता येईल. कोंडुऱ्याचा शब्द खोटा ठरेल असे त्यांना वाटते. "शिवा धनगराने सांगितलेले पाणी सत्य असणार हा विचार येताच तात्यांचा सगळा उत्साह आतल्याआत दडपून गेला. पाणी सापडू नये, शिवाचं म्हणणं खोट पडावं, एक गोष्ट खोटी ठरली की आपोआप दुसरीही गोष्ट खोटी ठरते.... तात्यांचं मन उलट्या दिशेला सरपटू लागलं. ते त्या दहाअकरा हात खोल खड्ड्यातल्या दमट ओल्या मातीवर बधिर होऊन उभे होते. हातातली कुदळ हातातच राहिली होती."[२] यावरून तात्या विकृती स्वीकारण्यास अनुत्सूक असल्याचे दिसते. शेवटी विहिरीमध्ये खडक लागतो. त्या खडकाखाली पाणी असल्याचे जाणवते. हा खडक बार लावून फोडू नये कारण पाणी पळते असा लोकांचा समज आहे. त्यावेळीही तात्या पाणी पळावे यासाठी बार लावण्याचा आग्रह धरतात. शिवा धनगराचं भविष्य खोटं ठरावं आणि आपणास ब्रह्मचर्याच्या पालनाच्या मानसिक विकृती फेकता यावी यासाठी पर्शरामतात्याची धडपड चालली आहे; पण शेवटी विहिरीचे काम बंद करण्यातून त्यांनी ब्रह्मचर्याची विकृती कायम स्वीकारल्याचे संकेत मिळतात.

पर्शरामतात्या आपल्या आईला आपणास कोंडुऱ्याची आज्ञा झाल्याचे आणि ब्रह्मचर्य पालन करण्याचे सांगितल्याचे सांगतात. या त्यांच्या सांगण्यामुळे घरातील वातावरण बदलून जाते. तात्यावर नेहमी रागावणारा त्यांचा भाऊ विष्णूदादा त्यांची पूजा करायला लागतो, घरातील सर्व माणसे त्याच्या देवत्वाची आराधणा करतात, आपल्या नवऱ्याला जवळ करू पाहणारी अनसूया या दिवसापासून तात्यापासून दूर रहायला लागते आणि स्वतःला जाळत जाते. पर्शरामतात्या ब्रह्मचर्याची विकृती स्वीकारत असेल तरी वेगवेगळ्या प्रसंगामध्ये त्यांची लैंगिक प्रेरणा जागृत झालेली दिसते. एक दिवस डोंगरामध्ये जाताना त्यांना अंगामध्ये देवी असलेली सुतारीण भेटते. या सुतारणीकडे पर्शरामतात्याची पाहण्याची दृष्टी वासनायुक्त आहे. सुतारणीने त्यांच्याशी बोलताना तुझे मन साफ नसल्याचा संकेतही दिलेला आहे. ही सुतारीण म्हणजे पर्शरामतात्याच्याच गावातील सुताराची बायको आहे. तिच्या अंगामध्ये देवी असल्याचा गावाचा समज आहे. म्हणून सर्व गाव तिला देवी मानतो. तात्याला या सुतारणीने भावकायच्या देवळाचा जीर्णोद्धार करण्याचा सल्ला दिला आहे.

पर्शरामतात्या गावात परत आल्यानंतर भावकायच्या देवळाचा जीर्णोद्धार करण्याचे ठरवतात. त्यासाठी गावातील श्रीमंत माणूस नारोबा जड्ये यांच्याकडून मदत घेण्याचे निश्चित करतात. या नारोबा जड्येने सुतारणीवर बलात्कार केल्याचे त्यांना नंतर कळते. देवी असणाऱ्या सुतारणीवर नारोबा बलात्कार कसा करु शकतो

याबद्दल त्यांच्या मनात प्रश्न चिन्ह निर्माण होते, पण तात्याने आता जीवनात विकृती पूर्णपणे स्वीकारली आहे. ते आता गावाच्या दृष्टीने साधुपुरुष झाले आहेत; म्हणून सुतारणीच्या गायब होण्याचा गैरफायदा ते घेतात. देवी मला भेटते आणि तिच्या सांगण्यावरून देवळाचा जीर्णोद्धार, भजन करत असल्याचे खोटे बोलतात. देवळाचा पुजारी आणि सुतारणीचा नवरा ही लोभी माणसे देवळाच्या उत्पन्नावर जगणारी आहेत. लेखकाने त्यांच्या निमित्ताने समाजातील कर्मकांडामागील वास्तव चित्रित केले आहे. ही माणसे पोटासाठी आपल्याच माणसांचा वापर करतात आणि संपत्तीसाठी, धनासाठी भांडताना दिसतात. तात्याला हे सर्व माहित होऊनही गप्प बसतात.

नारेबा जेड्येच्या मदतीने देवळाचा जीर्णोद्धार होणार असल्याने पर्शरामतात्या नेहमीच नारोबाच्या घरी जातो. नारोबाचा पुतण्या वासू आणि त्याची बायको पार्वती यांच्याशी संपर्क आल्यावर तात्याच्या मनामध्ये पार्वतीविषयी वासनेची भावना जागृत होते. नारोबा आणि पार्वतीचे अनैतिक संबंध असल्याचीही चर्चा गावात आहे. पर्शरामतात्यांना मात्र पार्वतीचा स्पर्श व्हावा असे वाटते. देवळामध्ये दर्शनाला आलेली पार्वती जेव्हा पर्शरामतात्यांच्या पाया पडत नाही तेव्हा ते चिडतात. यावरुन त्यांच्या मनातील वासनेला ते दडपू न शकल्याचे चित्रित होते. शेवटी त्याच्या मनातील विकृती वासना एवढी प्रबळ होते की, ते पार्वतीचा गर्भ जिरविण्यासाठी तिला मुळीचे पाणी देतात. त्यानंतर तात्याची वासना अधिकच वाढत जाते. आपल्या घरी आपल्याच बायकोकडे ते वासनेच्या नजरेने पाहतात. आपल्या नवऱ्याच्या देवपणाला आपल्यामुळे डाग लागू नये यासाठी अनसूया त्यांना विरोध करते; पण वासनेच्या आवेगापुढे तिचा प्रतिकार दुबळा पडतो; पर्शरामतात्या आपल्याच बायकोवर बलात्कार करतात.

'कोंडुरा' या चिं. त्र्यं. खानोलकरांच्या कादंबरीचा विचार केल्यास वासनेला दाबण्याचा प्रयत्न केल्यास आणि वासना प्रबळ असतानाही ब्रह्मचर्याची खोटी विकृती स्वीकारल्यास कोणता परिणाम होतो, याचे चित्रण कादंबरीत येते. या कादंबरीमधून मानवाच्या निसर्गविषयक आकलनाच्या प्रभावाचा भाव आविष्कृत झाला आहे. चिं. त्र्यं. खानोलकरांच्या मनावरील कोकणातील संस्कार, तेथील श्रद्धा समजूती, कोकणचा आदिम परिसर याचा प्रभाव कादंबरीतून आलेला दिसतो. कोंडुऱ्याची संकल्पना अशाच त्यांच्या मानसविश्वावरील प्रभावातून आलेली आहे. त्यांचे आजोळ बागलाची राई आणि तेथील त्यांच्या वास्तव्यातून खानोलकरांचे मन तयार झालेले आहे. त्याचाच प्रभाव कादंबरीमध्ये पडला असावा. चिं. त्र्यं. खानोलकरांच्या साहित्यावरील बागलाच्या राईच्या प्रभावाविषयी डॉ. अरुणा ढेरे म्हणतात. "बागलाच्या राईचा खानोलकरांच्या मनावरील प्रभाव आपण पाहिला. खानोलकरांमधल्या कलावंताची शक्ती आणि श्रेष्ठता यांचे ते उगमस्थान आहे. या राईमधल्या संस्कारांनी त्यांच्या अबोध मनातील आदिम अनुभवाचे संचित जागवले, चाळवले, आणि या संचितातून त्यांच्या कादंबऱ्यांचे विश्व आकाराला आले. या विश्वाचा फार प्रभावी घटक होऊन राहिलेली काव्यात्मता हीही शेवटी त्यांच्या प्रतिभेच्या आदिम जातकुळीतून ऊफाळून आली आहे, असे [illegible]"[3] याचाच अर्थ कोंडुरा आणि त्याच्याविषयीच्या श्रद्धा, समजूतीची संकल्पना खानोलकरांनी त्यांच्या आजोळातील प्रभावातून चित्रित केली आहे.

चिं. त्र्यं. खानोलकर आपल्या कादंबऱ्यांमधून वासनेची विविधरुपे चित्रित करतात. कोंडुरा या कादंबरीमध्येही प्रबळ वासनेचे एक रूप आले आहे. वासना ही मूळ लैंगिक प्रवृत्ती असून तिचे रुपांतर विकृतीत होण्याने कादंबरीचा आशय व्यापला आहे. भावाच्या टोमण्यामुळे पर्शरामतात्याने ब्रह्मचर्य पालनाची विकृती स्वीकारली असली तरी वासना त्यांची पाठ सोडत नाही. मग विहिरीच्या खणण्यातून, सुतारणीकडे वासनायुक्त नजरेतून पाहण्यातून, पार्वतीच्या अभिलाषेतून आणि शेवटी पत्नीवरच बलात्कार करण्यातून या मुळ प्रवृत्तीचे अटळ सामर्थ्य प्रतीत होते. चिं. त्र्यं. खानोलकर यांना 'कोंडुरा' कादंबरीमधून वासना दाबणे, दडपणे शक्य नसल्याचे सूचित करायचे असावे. या वासनेच्या मानवी जीवनातील प्रभावाबरोबरच भावकाय देवीच्या देवळाचा पुजारी, सुतारणीचा नवरा, नारोबा जडये ही सर्व विकृत माणसे आहेत. माणूस जगताना पशुपातळी गाठू शकतो, ही पशुपातळी या पात्रांच्या वर्तनातून आणि तात्याच्या समग्र चित्रणातून लेखकाने प्रभावीपणे चित्रित केली आहे.

चिं. त्र्यं. खानोलकराच्या कादंबरीमधील हा वासनेचा खेळ प्रबळ वाटतो. त्यांच्या 'कोंडुरा' मधून चित्रिण होणारी वासना ही आदिम पातळीवरची आहे. त्यामुळे ती विकृतीच्या रुपाने चित्रित होते. आदिम वासनेला ब्रह्मचर्याचा बांधही रोखू शकत नसल्याचे वास्तव कादंबरीकाराला चित्रित करायचे असावे असे कादंबरी वाचनानंतर जाणवते.

**संदर्भ :**


१. कोंडुरा, चिं.त्र्यं.खानोलकर, मौज प्रकाशन गृह, मुंबई, चवथी आवृत्ती, फेब्रुवारी २००८,पृष्ठ. सहा, सात

२. तत्रैव, पृष्ठ. ११

३. काळोखाचे कवडसे, अरूणा ढेरे, सुरेश एजन्सी, पुणे, नोव्हेंबर १९८७, पृष्ठ. १५


❑❑❑

UGC Approved Journal
Sr. No. 64310

ISSN 2319-8648

Indexed (IIJIF)

Impact Factor - 2.143

# Current Global Reviewer

UGC Approved International Refereed Research Journal Registered & Recognized
Higher Education For All Subjects & All Languages

## Special Issue

Issue I, Vol I 10th February 2018

Editor in Chief

Mr.Arun B. Godam

www.rjournals.co.in

| | | | |
|---|---|---|---|
| 33 | वैश्विकरण का दुर्बल घटकोंपर हुआ परिणाम | प्रा.राजाराम बाबासाहेब जाधव , प्राचार्या डॉ.रजनी शिखरे | 94 |
| 34 | शिवाजी के उपन्यास में व्यक्त नारी जीवन | श्री.शिंगटे अशोक भानुदास | 97 |
| 35 | वैश्वीकरण और मीडिया | डॉ. ओमप्रकाश बन्सीलाल झंवर | 99 |
| **Marathi** | | | |
| 1 | जागतिकिकरण आणि मराठी भाषेवरील परिणाम | डॉ.सदाशिव सरकटे | 102 |
| 2 | जागतिकीकरण आणि महानगरीय मराठी कविता | डॉ. समिता जाधव | 104 |
| 3 | जागतिकीकरणाचा मराठी भाषेवर पडलेला प्रभाव | प्रा.डॉ.गोंविद रामदिनेवार | 108 |
| 4 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा व अनुवादीत साहित्य | डॉ. गजानन पांडुरंग जाधव | 112 |
| 5 | जागतिकीकरण आणि मराठी कविता | प्रा. डॉ. रामचंद्र झाडे | 115 |
| 6 | जागतिकीकरणात मराठी कविता मधील 'जागतिकीकरणात माझी कविता' | डॉ.एम.ए.कव्हळे | 118 |
| 7 | जागतिकीकरण : अनुवाद आणि मराठी साहित्य संस्कृती | डॉ. पुरुषोत्तम शेषेराव जुन्ने | 122 |
| 8 | मराठी कविता व जागतिकीकरण | प्रा.अनंत उध्दवराव मोगल | 123 |
| 9 | जागतिकीकरण आणि मराठी भाषा | स.प्रा.ढास रवींद्र बाबासाहेब | 127 |
| 10 | जागतिकीकरणाचे मराठी साहित्यातील प्रतिबिंब | प्रा.गजानन आनंता देवकर | 130 |
| 11 | जागतिकीकरण आणि ग्रामीण कादंबरी | प्रा.डॉ.संतोष देशमुख | 133 |
| 12 | जागतिकीकरणात मराठीभाषा संदर्भातील मत | प्रा.डॉ.दादासाहेब गिऱ्हे | 136 |

CURRENT GLOBAL REVIEWER
ISSN : 2319 – 8648 Impact Factor : 2.143 SPECIAL ISSUE Issue I, Vol I, 10th Feb. 2018

# जागतिकीकरणात मराठी कविता मधील 'जागतिकीकरणात माझी कविता'

डॉ.एम.ए.कव्हळे
मराठी विभाग , सुंदरराव सोळंके महाविद्यालय,माजलगाव

---------------(6)---------------

प्रसिद्ध कवी आणि साहित्यिक उत्तम कांबळे यांचे वाङमय सर्वपरिचित आहे. आजचे युग हे खाजगीकरण, उदारीकरण आणि जागतिकीकरणाचे युग आहे. जागतिकीकरणाच्या या काळामध्ये साहित्य लेखनाचे स्वरूपही बदलत आहे. साहित्यामध्ये नवनवीन प्रवाह निर्माण होत आहेत. आज माहिती तंत्रज्ञानामुळे जग हे छोटेसे खेडे झाले आहे. जगाच्या कोणत्याही देशातील, कोणत्याही भागाची माहिती आपणास काही सेकंदामध्ये मिळू शकते. मानवाने आपल्या बुद्धीने ही सर्व प्रगती केली आहे. जागतिकीकरणाचे हे युग आपणास आकर्षक वाटत असले तरी त्यामागील वास्तव वेगळे आहे. या वास्तवाचे भान आपणास अनेक कवी करून देताना दिसतात. जागतिकीकरणाच्या आगमनाबरोबरच मराठी कवितेमध्येही त्याचे पडसाद उमटू लागले. अनेक कवींनी जागतिकीकरणाचे खरे वास्तव मांडण्याचा प्रभावी प्रयत्न केलेला दिसतो. या कवींमध्ये उत्तम कांबळे यांचे नाव अग्रगण्य आहेत.

उत्तम कांबळे यांच्या इतर साहित्य लेखनाप्रमाणेच 'जागतिकीकरणात मराठी कविता' हा संपादित कवितासंग्रह अत्यंत महत्त्वाचा आहे. या संपादित कवितासंग्रहामध्ये यशवंत मनोहर, अरूण काळे, इंद्रजित भालेराव, सुनिल अवचार, हेमंत दिवटे, महेंद्र भवरे, मंगेश काळे, लोकनाथ यशवंत, अजय कांडर, अजीम नवाज राही, वर्जेश सोलंकी, प्रा.राजेंद्र गोणारकर, शिवनयन ठाकरे, बालाजी इंगळे, रोहन नागदिवे, अजय खडसे, गौरी भोगले, गोविंद काजरेकर, काशिनाथ वेलदोडे, महेंद्र गायकवाड, प्रमोद माने, दीपध्वज कोसोदे, नीरजा, कैलास पगारे, केशव देशमुख, चंद्रकांत पोतदार यांच्यासह स्वतः उत्तम कांबळे यांच्या 'जागतिकीकरणात माझी कविता' या शीर्षकाखाली सतरा व 'कुणी सांगावं' अशा एकूण आठरा कविता आहेत. या त्यांच्या 'जागतिकीकरणात माझी कविता' कवितेंचा विचार याठिकाणी करावयाचा आहे.

जागतिकीकरणामुळे मानवी जीवनाची प्रगती झाली, मानवाचे जीवनमान उंचावले अशा एका भ्रमामध्ये मानव जगतो आहे. स्पर्धा हे जागतिकीकरणाचे पहिले सुत्र असते. त्यामुळे स्पर्धेच्या युगातीही वस्तू मोकळया हाताने येत नसून ती आपली स्वतःची संस्कृती घेऊन येत असते. नव्याचे आगमन आणि जून्या वस्तूचे कालबाहय होणे हा बाजाराचा नियम असतो. आजच्या जागतिकीकरणाच्या युगामध्ये बाजाराने मानवी मनाला गुलाम करण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. वस्तूच्या व्यापारासाठी मानवी मन ताब्यात घेऊन त्याला वस्तू वापरण्याचे व्यसन ही बाजारी संस्कृती लावत आहे. याच बाजारी संस्कृतीच्या आधीन राहून जगण्याला आजचा मानव दुर्दैवाने प्रतिष्ठित जगणे समजतो आहे. या जागतिकीकरणाच्या युगात जगणारे एक खेडे आणि या खेडयाला आलेले बकालपण यावर उत्तम कांबळे यांच्या कविता प्रकाश टाकतात.

जागतिकीकरण टोकाचा व्यक्तीवाद जन्माला घालते. त्यामुळे आधुनिक माणसाचे माणूसपण जाऊन त्याची वस्तू बनताना दिसते आहे. पूर्वी स्वयंपूर्ण समजली जाणारी खेडी आज बकाल झाली आहेत. अशाच एका बकाल झालेल्या, माणूसपण हरवलेल्या खेडयामध्ये उत्तम कांबळे यांची कविता विहार करते आणि जागतिकीकरणाचे दुष्परिणाम आणि भयान वास्तव चित्रित करते.

"शेताच्या काळजावरील
असंख्य भेगांवर अश्रू गाळत
बांधावरून माझी कविता
जागतिकीकरणाच्या लाटेत
हातातून निसटणारी सबसिडी
गच्च पकडण्याचा प्रयत्न करत होती."

अशा शेताच्या बांधावरून कवितेचा प्रवास सुरू होतो. ही कविता या बांधावरून बँकांच्या कर्जाखाली घुसमटणारा, आत्महत्या करणारा बळीराजा यांची संख्या मोजते आहे पण बळीराजाच्या आत्महत्येची कारणमिमांसा दिल्ली दरबारी वेगळीच

नोंदवली जाते. तो व्यसनामुळे किंवा जगण्याचं तंत्र विसल्यामुळे गेल्याचे दिल्लीतील सरकार सांगते आहे. सरकारबरोबर विरोधी पक्षानेही त्याच्या मृत्यूचे राजकारणच केल्याचे वास्तव या कवितेला समजते. बळीराजाच्या मरणाविषयीचे वाद आणि युक्तिवाद आता कवितेला पाठ झाले आहेत. बळीराजाच्या आत्महत्येनंतर त्याला वाहिली जाणारी खोटी श्रद्धांजली आणि कॅमेरा समोर असताना पोज देऊन पुसले जाणारे अश्रू हेही वास्तव तिला कळाले आहे.

"बळीराजाला कधी कुणी
पावलाखाली गाडलं
कुणी व्याजाखाली गाडलं
कुणी बाजारात मारलं
तर कुणी तो
बाजारात जाण्यापूर्वीच मारलं"

हे वामन, सावकार, दलाल आणि बळीराजाचं रक्त पिऊन लठठ झालेल्या बाजारपेठा जागतिकीकरणाचीच अपत्ये आहेत. हे बांधावरील वास्तव स्वीकारून कविता पांदीतून गावात पोहोचते तेव्हा जागतिकीकरण, खाजगीकरण, उदारीकरण व आधुनिकीकरणाच्या लाटांचे धक्के खाऊन उध्वस्त झालेल्या ग्रामदेवतेच्या मंदिरासमोर तिला क्रिकेटचा खेळ दिसतो. हा क्रिकेटचा खेळ गुलामीचे प्रतीक आहे. बॅट ऐवजी येथे तुटलेली स्लिपर, स्टंपऐवजी दगडाची उतरंड आणि बॉल म्हणून चिंध्याचा गोळा आहे असा हा नागडया मुलांचा खेळ. त्यामागे मात्र इट क्रिकेट, प्ले क्रिकेट, ड्रिंक कोकाकोला असे पोस्टर बाजारीकरणाची स्पष्ट कल्पना देणारे आहे. मंदिराच्या ओसरीवर दमेकरी म्हातारा जीवनवास्तवाचं गणित पुटपुटतो आहे,

"आमच्याच पंचक्रोशीतलं पाणी
टँकरमधनं नेत्यात
बाटलीत भरून पाठवत्यात
दहा-बारा रूपयाला एक बाटली
या भावानं
आम्हालाच घ्या म्हणत्यात
बाटलीभर पाण्यात
एवढं पैकं असतील
हे आम्हाला कंदी समजलंच नाही."

या कवितेमध्ये जागतिकीकरणाने गुलाम केलेला माणूस दिसतो. तरूणांच्या अंगात लढण्याची, क्रांती करण्याची, जग बदलण्याची शक्ती असते पण ते क्रिकेट या खेळाचे आणि तो चालावा म्हणून प्रयत्न करणारी कोकाकोला या कंपनीचे गुलाम झाले आहेत. जो दमेकरी म्हातारा हे वास्तव जाणतो त्याला काही करता येणे शक्य नाही. जागतिकीकरणामुळे माणूस गुलाम झाला आहे त्याचप्रमाणे ग्रामीण भागातील नैतिकतेचे अध:पतनही याच बाजारीकरणामुळे झाले आहे. गावामधील जिल्हा परिषदेची विद्यामंदिरे खिचडीपुरती राहिली आहेत आणि खाजगीकरणाच्या रेटयामध्ये डोनेशन मिळवण्यासाठी मॉडर्न इंग्लिश स्कूल निर्माण झाली आहेत. या नवीन शाळा बळीराजाच्या अर्थिक शोषणाची नवी केंद्रे आहेत. शेतकरी जनावरं, शेती विकून आपल्या मुलांना या मॉडर्न इंग्लिश स्कूलमध्ये डोनेशन भरून दाखल करतो. ही मुले पुढे नोकरी नाही म्हणून सत्संगाला जातात, पोरींची छेड काढतात किंवा डिगरी दाखवून हुंडयाचा बाजार तेजीत नेतात.

या देशाची शिक्षणव्यवस्था मुलांना अकाली प्रौढत्व बहाल करून देश बुडवण्याची व्यवस्था करताना दिसते. नवीन शिक्षणामध्ये ज्ञानापेक्षा पुस्तकाचेच ओझे जास्त झालेले दिसते. यावर टिका करताना उत्तम कांबळे लिहितात,

"पाठीचं कुबड निघावं
एवढं सारं दप्तर...
उद्या ही सारी पोरं मोठी होतील
आणि आपल्या कुबडावर
शंभर कोटींचा

देश घेऊन चालतील."

गावाची अवस्था आज भयानक झाली आहे. येथील आरोग्य केंद्रात औषध नाही, रस्त्यावर खडी नाही, शाळेत मुलं नाहीत, रात्रीचे दिवे नाहीत आणि सरकार मात्र यापासून अंग झटकताना दिसते आहे. कवीला हे मायबाप सरकार अशा कल्याणकारी योजनांतून रिटायर होताना दिसते. लोकांनी गावाला रस्ता मागितला पण सरकारने त्यांना टी.व्ही.टॉवर दिला. याचा समाचार घेताना कवी म्हणतो,

"लोकांनी टॉवरऐवजी रस्ता मागितला
शाळेवर टाकायला कौलं मागितली
पण सरकार म्हणालं,
रस्ता खाजगीकरणातून करू
पण टॉवर उभा करूच...
टी.व्ही. म्हणजे ज्ञानाचा स्पोट
टी.व्ही. म्हणजे वैश्विक खेडं
टी.व्ही. म्हणजे
माणसं शहाणं करणारं यंत्र"

अशा टी.व्ही.च्या येण्यानं खेडं उध्वस्त झालं. टी.व्ही.वर दाखविली जाणारी जाहिरात, चित्रपट, मालिका यामुळे ग्रामीण समाजव्यवस्था मोडकळीस आली. प्रतिष्ठित जीवन जगण्याच्या नावाखाली माणसे नितीमूल्ये विसरून एककल्ली झाली. गावामध्ये दारूने प्रवेश केला, सरपंचपद दारूच्या भटटीवर ठरवले जाऊ लागले. ही खेडयाची दयनीय स्थिती करण्यामध्ये जागतिकीकरण, बाजारीकरणाचा वाटा महत्त्वाचा आहे. जागतिकीकरण खेडयात आलं आणि त्यांच्या मोहानं खेडयातल्या लोकांनी गाव सोडला. म्हातारी माणसं सोडून सर्वजन शहराच्या आकर्षणानं शहराकडे पळायला लागली. याविषयी कवी म्हणतो,

"गाव हलायला लागलंय
गाव झिंगायला लागलंय
गाव झुरायला लागलंय
शहराच्या दिशेनं
धावायला लागलंय"

शहरात आल्यावर या ग्रामीण माणसांचे जीवन अधिकच विस्कटून जाताना दिसते. शहरात राहण्यासाठी पुटपाथ, तिथले बकाल जगणे, कामावर गुलामाची वागणूक, आपल्याच विश्वात जगणारी माणसं, स्थैर्य नसलेलं जीवन, माणसाची किंमत ठरवणारे दलाल अशा संकटाचा सामना करत हा खेडयातला माणूस जगताना दिसतो. मग खेडं बरं की शहर? माती बरी की डांबर? या प्रश्नांमध्ये माणूस अडकून पडतो. शहराच्या आकर्षणाने शहरात येऊन वसलेल्या माणसाबददल उत्तम कांबळे लिहितात,

"गावाकडं उपाशी पोटाला
छत तरी होतं
आणि इथं
बारा बिघ्यांचा
गावचा पाटील
गटारीवर बसतोय
तांब्याभर पाण्यासाठी
बंगल्यासमोर भीक मागतोय"

हे सर्व होण्याचे कारण शहरातील नव्या संस्कृतीत आहे. शहरी संस्कृती माणसाची वस्तू करणारी आहे. जागतिकीकरणाने जन्माला घातलेला टोकाचा व्यक्तिवाद हा शहरी संस्कृतीचा केंद्रबिंदू आहे. जेथे नैतिकतेचे अध:पतन झालेले आहे अशाठिकाणी माणसाचे जगणे प्राण्यासारखे असते. इथली माणसं,

"सारं जग जवळ आलंय म्हणतात
पण माणसं माणसांपासून
दूर धावताहेत
माणसांऐवजी कुत्र्यावर
कुत्र्यांऐवजी यंत्रावर
विश्वास टाकताहेत
सगळयांचे खांदे भरलेत
स्वत:च्याच स्वार्थानं"

त्यामुळेच कवीला वाटते की, या जागतिकीकरणामुळे एक दिवस मानवजातीचा समुळ नाश होईल व दयाळू संगणक

"अंतराळात, मानवाच्या थडग्याशेजारी
शोकसभा घेतील
दु:खवटयाचा ठराव मांडतील
मनापासून भाषणही करतील,
पृथ्वीच्या पाठीवरील
माणूस नावाची जमात किती चिवट होती
दु:ख एवढंच की,
ती माणसासाठी कधीच लढली नाही."

जागतिकीकरण, खाजगीकरण, आधुनिकीकरण आणि बाजारीकरणाच्या या युगात माणसाला किंमत नसून संपत्ती, प्रतिष्ठित जीवन, यंत्राला महत्त्व प्राप्त झाले आहे. खेडयाचा समूळ नाश या यंत्रजीवनाने केला असून एक दिवस मानवजातीच्या नाशाला ते कारण ठरू शकते असे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद भूसविलेल्या श्री.उत्तम कांबळे यांना वाटते. जागतिकीकरणात माझी कविता या संपादित कवितासंग्रहाला त्यांनी लिहिलेली प्रस्तावना जागतिकीकरणाची संकल्पना स्पष्ट होण्यासाठी महत्त्वपूर्ण आहे. त्यांचा हा संपादित ग्रंथ जागतिकीकरणावरील कवितांच्या प्रवाहात मैलाचा दगड आहे असे म्हटल्यास अतिशयोक्ती ठरणार नाही.


संदर्भ ग्रंथ :

१. जागतिकीकरणात मराठी कविता - संपादक उत्तम कांबळे
२. जागतिकीकरणात माझी कविता - उत्तम कांबळे
३. ग्लोबलच गावकुस - अरूण काळे
४. वाड्मयीन प्रवृत्ती तत्वशोध - संपादक केशव मेश्राम

Peer Reviewed Referred and
UGC Listed Journal
(Journal No. 40776)

ISSN 2277 - 5730

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL






Volume-VII, Issue-IV
October - December - 2018
Marathi / Hindi Part - I

# AJANTA

IMPACT FACTOR / INDEXING
2018 - 5.5
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १५ | मराठी साहित्य आणि संगीत संबंध<br>**प्रा. वंदना मधुकरराव देशमुख** | ६९-७१ |
| १६ | जी. ए. कुलकर्णी यांच्या 'वस्त्र' कथेतील आदिबंध<br>**डॉ. एम. ए. कव्हळे** | ७२-७४ |
| १७ | संत तुकारामांच्या मनविषयक विचारांचा शोध<br>**प्रा. डॉ. हनुमंत मारोती भोपाळे** | ७५-७८ |
| १८ | लोकसाहित्य आणि महत्त्व<br>**सहायक प्रा. अडसरे व्ही. बी.** | ७९-८२ |
| १९ | ग्रामीण, दलित व उपेक्षीत समाजाती मुलांवर केंद्रिय लघुपट<br>**प्रा. अर्चना सं. देशपांडे** | ८३-८७ |
| २० | 'थॅंक यू मिस्टर ग्लाड' या नाटकातील मि. ग्लाडचे व्यक्तिचित्र<br>**प्रा. डॉ. अविनाश श. धोबे** | ८८-९० |
| २१ | ललिताचे स्वरुप आणि समाजाभिमुखता<br>**प्रा. सुनिता गोरख रोकडे** | ९१-९६ |
| २२ | मराठी दलित कवितेतून व्यक्त झालेला मानवी हक्काचा विचार<br>**प्रा. दिपक संतोष पवार** | ९७-१०० |
| २३ | ग्रामीण साहित्य : प्रेरणा आणि स्वरूप<br>**प्रा. डॉ. राजकुमार रघुनाथ मुसणे** | १०१-१०५ |
| २४ | जागतिकीकरण आणि मराठी भाषा<br>**प्रा. डॉ. टापरे अंजली** | १०६-१०७ |
| २५ | वऱ्हाड प्रांतातील सुफी संतांचे साहित्य योगदान<br>**किशोर मारोतीराव वानखडे** | १०८-१११ |

# १६. जी. ए. कुलकर्णी यांच्या 'वस्त्र' कथेतील आदिबंध

**डॉ. एम. ए. कव्हळे**
मराठी विभाग, सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव, जि. बीड.

जी.ए.कुलकर्णी यांच्या 'रक्तचंदन' नावाच्या कथासंग्रहामध्ये 'वस्त्र' नावाची कथा आलेली आहे. ही कथा मुखवटयाच्या आदिबंधाचे प्रभावी चित्रण करणारी आहे. मिस डिसोझा या हॉस्पिटलमध्ये काम करणारी नर्स हिची व फारसे शिक्षण न झाल्यामुळे तिच्या नोकरीवर आलेल्या गडांतराची ही कथा आहे. या नोकरी जाण्याच्या निमित्ताने मानवी मुखवटे धारण केलेली माणसे आणि त्याच्यामागील त्यांचे वास्तव चेहरे उलघडून दाखविण्याचा लेखकाचा प्रयत्न आहे. वस्त्र ही या कथेतील प्रमुख आदिप्रतिमा असून त्याद्वारा मुखवटयाचा आदिबंध आविष्कृत झाला आहे.

मिस डिसोझा या हॉस्पिटलमध्ये आलेली बरीच वर्षे लोटून गेली आहेत. एकदा तिच्या भावाच्या बायकोने तिचे कपडे रस्त्यावर फेकले आणि ती या हॉस्पिटलमध्ये आली. पंधरा वर्षापुर्वी माळरान असलेले हे हॉस्पिटल तिने स्वीकारले. प्रामाणिकपणे रुग्णांची सेवा केली, रुग्णांना धीर दिला, डॉक्टरापासून रुग्णापर्यंत सर्व प्रकारची कामे तिने निष्ठेने केली. पण आता हॉस्पिटलची अवस्था बदलली आहे. हा माळ आता इमारती आणि पैशाने तालेवार झाला आहे. रोगी मोटारीतून यायला सुरुवात झाली आहे आणि भौतिकदृष्टया हॉस्पिटल समृद्ध झाले आहे. या यंत्रयुगाच्या आगमनाने मिस डिसोझाच्या जीवनातही वादह आले आहे. अमेरिकन डिग्री घेतलेला नवा सीएओ तपासणीला आल्यानंतर या अशिक्षित मिस डिसोझाला पाहून संतापला, त्यानंतर पेपरमध्ये जाहिरात आली आणि शांता पै नावाच्या स्त्रीची निवड मिस डिसोझाच्या जागी झाली. यामुळे अनेकांनी तिला पुढे काय ? हा प्रश्न विचारला, कोणी सहानुभूतीने बोलले, कोणी कुत्सितपणे हसलेही. आता शांता पै येण्याचा दिवस जवळ आला, मिस डिसोझाच्या मनामध्ये विचाराचे वादळ सुरु झाले. वस्त्र विणण्यामध्ये ती कुशल होती. तिने हॉस्पिटलमध्ये आलेल्या दिवसापासून अनेक वस्त्रे विनली आणि इतरांना वाटली. यातूनच तिच्या जीवनाचे एक वस्त्र तयार झाले आहे. "तिने एक निश्वास सोडला. आता इतक्या वर्षानंतर येथे हाडे हलवून आयुष्याचे वस्त्र विणले, ते टाकून दुसरे विणीचे, नव्या आकृतीचे दुसरे वस्त्र पुन्हा सुरु करायचे? कुठे?* कसे? आपले कपडे रस्त्यावर फेकलेले पाहताच तिने ते गोळा केले व वाहणा घेण्यासाठी तिने घरात पाउल न टाकता, तिने अनवाणीच तापलेल्या रस्त्यावरुन स्टेशन गाठले होते पण त्यावेळी पाठ ताठ होती आणि अंगावरील मांस लोखंडाचे होते. आता हे सारे पिंजून कातून त्याचे वस्त्र केले व निवारासाठी अंगावर घेतले आणि आता ते टाकून जायचे ते कुठे?"[1] असा प्रश्न तिला सतावत आहे. याठिकाणची वस्त्राची प्रतिमा ही मुखवटयाच्या आदिबंधाची मूर्त प्रतिमा आहे. तिच्या आजपर्यंतच्या जीवनामध्ये तिच्या सहवासामध्ये आलेल्या लोकांविषयी तिने मुखवटा तयार केला आहे. प्रत्येकाची सेवा करताना, मदत करताना हॉस्पिटलमध्ये राबताना तिच्या सहवासात आलेल्या डॉक्टर, रुग्ण आणि त्यांचे नातेवाईक याविषयीची तिच्या मनात निर्माण झालेली भावना याचे रुप म्हणजे वस्त्र होय. मानसशास्त्राच्या भाषेमध्ये सभोवतालच्या जगाविषयीचा एक भाव मुखवटयाच्या रुपाने तिने जपला आहे व त्याचे वस्त्र तयार केले आहे.

शांता पै येणार असल्याने आपणास हॉस्पिटल सोडावे लागणार हे सत्य तिने स्वीकारले आहे. पण आपण या हॉस्पिटलमध्ये प्रामाणिकपणे काम केल्याचा अभिमान तिच्या मनामध्ये आहे. अठठावीस खाटावर आजपर्यंत अनेक स्त्रिया आल्या, वेगवेगळया भाषा बोलत असलेल्या, वेगवेगळया भागातील या स्त्रियांची तिने आपुलकीने काळजी घेतली. त्यांच्याबरोबर तिचे भावनिक नाते निर्माण झाले होते. पार्वती देशमुख, राधाबाई अष्टपुत्रे, मोहिनी दास, धोपेश्वरबाई, चंद्रमा, सावित्री यासारख्या असंख्य स्त्रियांसोबत तिच्या जीवनाचे वस्त्र विनले गेले होते. प्रत्येक अडचणीला, संकटाला ती त्यांच्यासाठी धावून गेली आहे. या हॉस्पिटलमधील पंधरा वर्षामध्ये मोठा गोतावळा निर्माण झाल्याचे सुख. मिस डिसोझाला या शेवटच्या क्षणीही महत्वाचे वाटत होते. आपण जीवनामध्ये एवढा गोतावळा निर्माण केला हीच आपल्या जीवनाची सार्थकता आहे असे विचार तिच्या मनात घोळू लागले. या सर्वांचा निरोप घ्यायला हवा, आपण जात असल्याचे या सर्व स्त्रियांना दुःख होईल या भावनेने ती त्यांचा निरोप घेण्यासाठी वार्डमध्ये प्रवेश करते.

या वार्डमध्ये प्रवेश करताच मिस डिसोझाला सर्व स्त्रियांचे वास्तव रुप कळते. सावित्री डिसोझाचा अभिनय करत आहे आणि इतर स्त्रिया त्याचा आनंद लुटत आहेत. मिस डिसोझाची हॉस्पिटलमधून होणारी हाकालपट्टी यावर ते नाटय करतात. याठिकाणी या स्त्रियाविषयीचा मिस डिसोझाच्या मनातील मुखवटा भंग पावतो. तिच्या वस्त्राच्या धाग्याचे तुटणे यातून तो सूचित होतो. या सर्व रुग्ण स्त्रियांविषयी तिने वस्त्राचा विनलेला धागा तुटून तिला वास्तवाची प्रचिती आली आहे. या धक्क्यातून तिला सावरण्याचे काम डॉ. दामले करतात. मिस डिसाझाला तिच्या घरापर्यंत बॅटरीच्या साहयाने पोहोचविण्याचे काम ते करतात. वाटेत बोलताना तिला धीर देतात. अंधारातील त्याचे आपुलकीचे शब्द तिला धीराचे वाटतात. तिला घरी पोहोचवून दामले निघून गेला. मिस डिसाझाला दामलेविषयी करुणा वाटली. याच हॉस्पिटलमध्ये त्याची बायको वारली आणि त्याने नोकरी पत्करली. त्याचीही नोकरी तिच्यासारखीच अधांतरी होती. त्याच्याविषयी मिस डिसोझाच्या मनात वस्त्राचा एक धागा विणला गेला होता.

रुमवर आल्यावर तिने आपली सुटकेस भरली. रात्रीच्या वेळीची अनामिक भीती मनात असतानाही तिने स्टेशनकडे जाण्याचा निर्णय घेतला. स्टेशनवर आल्यावर तिची भेट पिंन्टोशी झाली. पिटो हा तिचा गाववाला रेल्वेमध्ये नोकरीला होता. गाडीला तासभर उशीर असल्याने पिन्टोने तिला सेकंड क्लास वेटिंगरुममध्ये बसविले. तिची आस्थेने चौकशी केली, तिचा भाउ वारल्याची घटनाही त्यानेच तिला सागीतली. भावाच्या जाण्याच्या धक्क्याने ती रडत असताना पिटो तिच्या जवळ आला. त्याच्या मनामध्ये तिच्याविषयी वासना निर्माण होउन तिच्यावर तुटून पडला. मिस डिसोझाने त्याच्यावर सुटकेसचा वार करुन हॉस्पिटलकडे पळ काढला. याठिकाणी सुरुवातीला आधार वाटणारा पिन्टो तिच्याविषयी कोणता विचार करत होता याची तिला कल्पना येते. हॉस्पिटलमधील स्त्रियांप्रमाणेच त्याच्या बाबतीत पिणलेला धागाही याठिकाणी तुटून जातो. पिन्टोपासून पळ काढून मिस डिसोझा हॉस्पिटलमधील घरी येते. इमानदार कुत्रा याने मात्र तिच्या जाण्याने ब्रेडचा तुकडाही खाल्लेला नसतो.

पहाटेच दारावर आवाजाने ती उठते, तेव्हा दामले डॉक्टर घरी येतात. घरातील अवस्था पाहून तिला घर न सोडण्याचा सल्ला देतात. मिस डिसोझाला मात्र त्यांनी इथून निघून जावे असे वाटत होते. पण दामले डॉक्टर तिच्याजवळ येवून ओठावरुन जीभ फिरवत म्हणाला, ''तुला मदत नाही करायची तर करायची कुणाला?''[2] या दामलेच्या वर्तनाने मिस डिसोझाचे वस्त्र पुर्णतःच फाटून गेले. दामले डॉक्टरविषयीचा विश्वासाचा शेवटचा धागाही यामुळे तुटला गेला.

'वस्त्र' या कथेच्या माध्यमातून कथाकार जी.ए.कुलकर्णी मुखवटयाचा आदिबंध आविष्कृत करतात. सर्वसामान्य माणूस जीवन जगताना वेगवेगळया व्यक्ती आणि व्यवस्थेविषयी स्वतःचे एक मत तयार करत असतो. या मतावरुनच त्यांच्याशी आपले संबंध आणि वर्तन निश्चित होत असते. मिस डिसोझाने हॉस्पिटलमधील रोगी स्त्रिया , पिन्टो आणि दामले डॉक्टर आपले सहकारी आपल्यावर प्रेम करणारे, आपली काळजी घेणारे मानव आहेत असा तिचा समज झाला आहे. पण शांता पै च्या नियुक्तीच्या निमित्ताने या मानवाचे खरे मुखवटे तिच्यासमोर आले आहेत. मानवी जीवनाच्या अनुभवाचे वस्त्र विणताना त्याच वस्त्राचा एक एक धागा तुटत जातो आणि शेवटी माणूस एकाकीच राहतो. याचे सूचनही कथाकाराला करावयाचे आहे. मानवी समाजामध्ये राहणारी, स्वतःला प्रतिष्ठित समजणारी, वरुन सभ्यतेचा आव आणणारी माणसे आतून, मनाने किती वाईट असू शकतात, याची प्रचिती कथा वाचल्यानंतर येते. मानवाचा चेहरा व त्यामागे एक मुखवटा आहे आणि हा मुखवटा कळल्याखेरीज अंतिम मानवी रुपाचे खरे दर्शन होत नाही. हा मुखवटा फाडण्याचे काम जी.ए.कुलकर्णी 'वस्त्र' या कथेच्या माध्यमातून करताना दिसतात.

**संदर्भ**

1. जी.ए.कुलकर्णी, रक्तचंदन, पॉप्युलर प्रकाशन मुंबई, पाचवी आवृत्ती, 2009, पृष्ठ 109
2. तत्रैव, पृष्ठ 93,94

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION

Impact Factor – 6.261 ISSN – 2348-7143

INTERNATIONAL RESEARCH FELLOWS ASSOCIATION'S

# RESEARCH JOURNEY

**Multidisciplinary International E-research Journal**

PEER REFREED & INDEXED JOURNAL

October-2018
Special Issue-66

## Society, Culture and Environment

**Chief Editor -**
Dr. Dhanraj T. Dhangar,
Assist. Prof. (Marathi)
MGV'S Arts & Commerce College,
Yeola, Dist – Nashik [M.S.] INDIA

**Executive Editors :**
Dr. Satish Desai
Asso. Prof. Department of Sociology
Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe College,
Miraj, Dist-Sangli [M.S.] INDIA

For Details Visit To : www.researchjourney.net

SWATIDHAN PUBLICATIONS

| | | | |
|---|---|---|---|
| 53 | डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि सामाजिक परिवर्तन | आबासाहेब कसबे | 250 |
| 54 | साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा अनुबंध | डॉ. एम.ए. कन्हळे | 254 |
| 55 | भारतीय समाज आणि सामाजिक समस्या | प्रा. आर. के खोकले | 257 |
| 56 | साहित्य आणि समाज | डॉ. सविता खोकले | 263 |
| 57 | वायू प्रदूषण : एक आव्हान | डॉ. दत्तात्रय खुणे | 265 |
| 58 | सत्यशोधक कथेतील समाजजीवन | पल्लवी कोडक | 269 |
| 59 | माळशिरस तालुक्यातील वीटभट्टी उद्योगाचे पर्यावरणीय परीक्षण | प्रा. डी. ए. कोकाटे | 276 |
| 60 | शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे | डॉ. सौ मंजिरी कुलकर्णी | 280 |
| 61 | जागतिक तापमान वाढीचे शेती क्षेत्रासमोरील आव्हान : एक पर्यावरणीय अभ्यास | डॉ. सी. बी. लोंढे | 282 |
| 62 | आदिवासी समुदायातील कला : एक संस्कृती | डॉ. महेश मगर | 287 |
| 63 | आदिम कोलाम समाज व संस्कृती | प्रा. सौ. श्यामला माने व डॉ. शैलजा माने | 290 |
| 64 | महिला पोलीस आणि सामाजिक परिवर्तन | प्रा. जी. टी. मोकासरे | 295 |
| 65 | आपत्ती व्यवस्थापनात स्वयंसेवक संस्थांची भूमिका | डॉ. माधव मोरे | 298 |
| 66 | भारतीय समाज आणि संस्कृती | प्रा. चांगदेव मुंढे | 303 |
| 67 | स्वयं सहाय्यता बचत गटांच्या मार्फत सामाजिक स्थित्यंतरण | प्रा. दत्तात्रय मुंढे | 306 |
| 68 | मानवी जीवन आणि पर्यावरणातील प्रदूषण | डॉ. जनार्दन परकाळे | 310 |
| 69 | पर्यावरण संरक्षण व शासकीय योजनांचा अभ्यास | प्रा. कलंदर पठाण | 315 |
| 70 | शिक्षण महर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांचे महाराष्ट्राच्या शैक्षणिक विकासातील योगदान | डॉ. सज्जन पवार | 319 |
| 71 | पर्यावरण संरक्षण व संवर्धनात नागरिकांची भूमिका | प्रा.अरुण पेंटावार व प्रा.आशा पोतलवाड | 323 |
| 72 | पर्यावरण आणि मराठी कविता | प्रा. रमेश रिंगणे | 327 |
| 73 | समाज प्रबोधनकार संत गाडगे बाबा | प्रा. दादा साठे | 331 |
| 74 | महादेव कोळी समाजातील स्त्री संस्कृती | डॉ. विकास शेवाळे | 334 |
| 75 | घिसाडी जमातीच्या कौटुंबिक व विवाह पद्धतीतील बदलते स्वरूप | डॉ. जयसिंग सिंगल | 338 |
| 76 | सामाजिक प्रश्न व पर्यावरण | प्रा. विनायक वनमोरे व प्रा. अशोक खोत | 345 |
| 77 | समाज व संस्कृती | सुरेखा व्हसमने | 348 |
| | **हिंदी विभाग** | | |
| 78 | भारतीय समाज के साहित्य में वर्णित वरिष्ठ नागरिक | डॉ. राजेंद्र बगाटे | 351 |
| 79 | भारतीय संस्कृती : त्यौहार एवं प्रदूषण | डॉ. के. बी. गंगणे | 355 |
| 80 | ग्लोबल वार्मिंग : समस्या और समाधान | डॉ. बी. आर. नळे | 358 |


*या अंकाचे सर्व अधिकार प्रकाशकांनी स्वतःकडे राखून ठेवलेले आहेत. लेखांचे प्रकाशन वा पुनर्प्रकाशनाचे अधिकार प्रकाशक आणि संबधित लेखाकाधीन समान असून शोध निबंधातील मते ही संबधित लेखाच्या लेखकांची वैयक्तिक मते आहेत त्या मताशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही.*

# साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा अनुबंध

**डॉ. एम. ए. कव्हळे**
साहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग
सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव
जि. बीड, ४३११३१
भ्रमणध्वनी-९७६४९२६९३९

साहित्य हा समाजाचा आरसा असतो. समाजाचे प्रतिबिंब साहित्यातून दिसत असते तर उत्तम समाज निर्माण करण्यासाठी साहित्य दिशादर्शक ठरत असते. म्हणून साहित्य आणि समाज यांचा अन्योन्य असा संबंध असतो. जसा साहित्य आणि समाजाचा अन्योन्य सबंध आहे त्याचप्रमाणे समाज व संस्कृतीला वेगळे करून चालत नाही. प्रत्येक समाजाची, समूहाची विशिष्ट अशी जीवन जगण्याची पद्धती असते. या पद्धतीवरूनच त्या समाजाचे वेगळेपण व विशिष्टत्व ठरत असते. अशा संस्कृतीला समाजापासून वेगळे करणे शक्य नाही. साहित्य समाजाचे चित्रण करते म्हणजेच पर्यायाने त्या समाजाच्या संस्कृतीचेही चित्रण करते. त्यामुळे साहित्यामधून एखादा समाज त्याच्या संस्कृतीसह प्रकट होत असतो. याचाच अर्थ साहित्य, समाज आणि संस्कृती यांचा परस्परसंबंध असतो. समाज व संस्कृतीशिवाय साहित्य निर्माण होऊ शकणार नाही तर साहित्याशिवाय समाज आणि संस्कृतीला दिशा मिळणार नाही. म्हणूनच साहित्य, समाज व संस्कृती यांचा अनुबंध महत्वपूर्ण ठरतो.

माणूस हा समाजशील प्राणी आहे. माणूस समाजाशिवाय राहू शकत नाही. मानवाच्या जन्मापासून मृत्यूपर्यंत त्याच्या सभोवतालचा समाज, संस्कृती, व्यक्ती, परिस्थिती, पर्यावरण, निसर्ग हा त्याच्यावर प्रभाव पाडत असतो. त्याचा विकास आणि जगणे याला समाज प्रभावित करत असतो. लेखक किंवा कलावंत याला अपवाद नसतो. समाजात राहूनच लेखक आपला लेखनव्यवहार पूर्ण करत असतो. त्याला लेखनासाठी लागणारे खाद्य पुरविण्याचे कार्य त्या समाजाकडून होत असते. समाजामध्ये जगत असताना, त्याचा अनुभव घेताना, त्याचे निरिक्षण करताना प्रतिभावान लेखकाला जे वाटते, ते कोणत्यातरी साहित्यप्रकारातून तो मांडण्याचा प्रयत्न करतो. लेखकाच्या या विचारामध्ये व्यक्तीचा नाही तर समष्ठीचा विचार केलेला असतो. त्यामुळे लेखकाचे लेखन, साहित्य समाजातील प्रश्नावर, समाजातील विविध घटकावर आधारित असते तर त्यामुळे समाजाला दिशा मिळत असते. लेखक व समाजाच्या संबंधाबाबत डॉ.नागनाथ कोत्तापल्ले लिहितात, "शेवटी कलावंत हा काही आकाशातून पडत नाही. त्याची जी काही जडणघडण होते ती त्याच्या समाजातच होते. 'वेडाची बहिण असलेली प्रतिभा' त्याच्याजवळ असली तरी हा माणूस विकसित होतो, विचार करतो ते त्याच्या भोवतीच्या वातावरणातूनच. त्याच्या भोवतीचे समाजकारण, राजकारण, अर्थकारण, कुटुंबव्यवस्था आणि संस्कृती त्याला घडवित असते. शिवाय तो जे अनुभव प्रकट करू पाहतो ते तरी कुठले असतात ? त्या अनुभवाचे रसायन त्याला मिळालेले असते ते त्याच्या भोवतीच्या परिसरातूनच. त्याची दृष्टी तयार झालेली असते तीही त्याच्या भोवतीच्या विश्वातील अनुभवातून आणि भोवती चालणाऱ्या सामाजिक चळवळीतून. याचा अर्थच असा की तो आपल्या भोवतीच्या परिसरातूनच आशय द्रव्याची निवड करतो आणि त्यातूनच त्याची दृष्टी तयार होत गेलेली असते"[१] याचा अर्थ समाजाशिवाय साहित्याची कल्पना होऊ शकत नाही. साहित्यिक जन्माला यावा लागतो असे जरी म्हटले जात असले आणि ते काही प्रमाणात सत्य असले तरी जन्मलेल्या साहित्यिकाला वाढविण्याचे, मोठे करण्याचे व उभे करण्याचे कार्य मात्र समाजच करत असतो. त्यामुळे साहित्यिकाला व त्याच्या साहित्याला समाजापासून वेगळे करता येत नाही. साहित्य निर्मितीसाठी समाज हा कारणीभूत आणि आधारभूत ठरतो.

साहित्य हे समाजातून निर्माण होत असेल किंवा लेखक, कलावंताना समाज पुरक ठरत असेल तर साहित्यिकाची सामाजिक बांधिलकी असते की, त्या समाजाला पुरक, दिशादर्शक, उपकारक अशा मूल्यांची मांडणी आपल्या साहित्यातून

केली पाहिजे. समाज कितीही पुढारलेला, गुणवत्तेने भरलेला असला तरी समाजाच्या विविध घटकामध्ये बदलत्या काळानुसार साचलेपण, काही विकृती निर्माण होत असतात. विविध संस्था, त्यांची कार्यपद्धती काळानुसार कालबाहय होत असते. अशा कालबाहय गोष्टी समाजाला घातक ठरत असतात. या गोष्टीना योग्य वेळी मुरड घालता आला नाही तर त्याचा परिणाम समाजविभाजनामध्ये होतो, समाज दुभंगण्याची शक्यता असते. पण अशा गोष्टींचे समर्थन करणारे काही घटक समाजात कार्य करत असतात. या घटकांना न जुमानता समाजाच्या उन्नतीसाठी, समाजाच्या विकासासाठी व एकात्मतेसाठी कालबाहय बाबी नष्ट होणे अगत्याचे असते. या बाबींकडे प्रथमतः लक्ष वेधण्याचे कार्य साहित्यिक करत असतात. साहित्य फक्त समाजातील वाईट, कालबाहय बाबींची नोंदच घेते असे नाही तर पर्यायी व्यवस्था व उपाय सूचविण्याचे कार्यही साहित्य पार पाडत असते. लेखक आपल्या काळाशी, स्वीकारलेल्या मूल्यांशी व आपल्या निष्ठांशी प्रामाणिक असला की तो रसिकतेला परिचित नसलेले जनजीवन मोठया ताकदीने प्रकट करतो व समाजाला दिशा देण्याचे कार्य करतो. अशा लेखकाच्या लेखनाविषयी डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात, "आजचे लेखक हे कल्पनासृष्टीपेक्षा वास्तवावर आधारित असे जास्त लिहितात. वास्तवात असलेल्या जगण्याविषयी, वास्तवात असलेल्या अनुभवविश्वाविषयी ते प्रकर्षाने लिहितात.आजपर्यंत साहित्याचा विषय न झालेली माणसे आणि त्यांचे भावविश्व, प्रत्यक्ष जीवनसंघर्ष ते साहित्यातून चित्तारतात. आशय विषयाच्या दृष्टीने ते रसरसीत व ताजे जीवंत असे असल्याचे त्यांच्या लेखनातून जाणवते. म्हणून ते रंजन करण्याच्या किंवा बोध करण्याच्या हेतुनेही लिहिले जात नाही. साहित्यनिर्मितीकाराच्या जीवनानुभवाचाच तो एक भाग असतो. त्याचे वास्तवाशी घट्ट नाते असते. अनुभवाच्या मुशीतून ते अवतरलेले असते. मुख्य म्हणजे या साहित्याचे नाते वर्तमानाशी जोडलेले असते."[२] स्वातंत्र्योत्तर ग्रामीण, दलित, स्त्रीवादी साहित्याचा अभ्यास केल्यास वरील विधानाची सत्यता आपणास कळते आणि साहित्य व समाजाचा अनुबंधही आपल्या लक्षात येऊ शकतो.

व्यक्ती ही समाजाचा एक प्रमुख घटक असते. मानवा मानवांनीच समाज निर्माण होत असतो. व्यक्ती ही समाजाचे केंद्रस्थान असते त्याचप्रमाणे ती साहित्याचेही केंद्रस्थान असते. समाज आणि साहित्याचा जसा अन्योन्य संबंध असतो तसाच तो समाज व संस्कृतीचा आणि साहित्य व संस्कृतीचाही असतो. साहित्याचा, समाजाचा आणि संस्कृतीचा अत्यंत निकटचा संबंध आहे. संस्कृती ही एका विशिष्ट समाजाची जीवन जगण्याची पद्धती किंवा रीत असते. संस्कृती एका व्यक्तीची नसून ती समूहाची असते. एका विशिष्ट समाजाच्या समाज पद्धती, धर्मकल्पना, रूढी, परंपरा, चालीरिती, आचारविचार, संकेत, शिष्टाचार, कल्पना, भाषा, साहित्य, इतिहास, विज्ञान, श्रद्धा, अंधश्रद्धा, केशभूषा, वेशभूषा, आहार, सण उत्सव या सर्वांचा समावेश संस्कृतीत होतो. समाजात फक्त संस्कृतीच कार्यरत नसते तर प्रतिसंस्कृती आणि उपसंस्कृतीही कार्यरत असतात. साहित्य आणि संस्कृतीचा जवळचा संबंध असतो. साहित्य समाजाचे अपत्य असते म्हणजेच ते समाजाचे चित्रण करत असते. साहित्य समाजाचे चित्रण करते याचाच अर्थ ते विशिष्ट समाजातील संस्कृतीचे चित्रण करत असते. याविषयी प्रा. नरेंद्र मारवाडे म्हणतात, "कोणत्याही कालखंडातील साहित्य हा त्या त्या समाजाच्या संस्कृतीचा, सांस्कृतिक उपक्रमांचा आणि कालखंडाचा इतिहास असतो आणि प्रत्येक कालखंडाच्या गरजेनुसार आध्यात्मिक, ऐहिक, पौराणिक, ऐतिहासिक, पंडिती, शाहिरी, गद्य पद्य, बखर, कथा, कादंबरी, नाटय, दलित, ग्रामीण, जनवादी, स्त्रीवादी साहित्याची निर्मिती होत जाते."[३] या विधानाचा सुक्ष्मपणे विचार केल्यास लक्षात येईल की, मराठी साहित्य लेखनाचा प्रारंभबिंदू ते आजतागायत सर्व साहित्याच्या प्रकारातून चित्रित झालेले जीवन हे त्या त्या काळातील संस्कृतीचेच चित्रण आहे. मध्ययुगात भक्ती आणि शाहिरी वाङमय, साठोत्तरी ग्रामीण, दलित व स्त्रीवादी साहित्य त्या त्या कालखंडातील लोकसंस्कृतीचे वास्तव चित्रण चित्रित करताना दिसतात.

संस्कृती ही मानवनिर्मित असते. मानवाच्या विकासासाठी व जगण्यासाठी मानवाने ती निर्माण केलेली असते. त्यामुळे मानवी जीवनाचा संस्कृतीवर प्रभाव पडत असतो. मानवी जीवन जेवढे गतीमान तेवढीच त्या समूहाची संस्कृतीही गतीमान होते. गतीमानतेमुळे संस्कृतीला एक जिवंतपणा येत असतो. अशा गतीमान संस्कृतीमध्ये साचलेपण निर्माण

ISSN : 2348-7143
October. 2018

होण्याची शक्यता कमी असते. जसे वाहत्या नदीच्या पात्रातील पाणी प्रवाही आणि नितळ त्याचप्रमाणे गतीमान संस्कृती मानवी जीवनासाठी हितकारक असते. अशी संस्कृती मानवी समूहाला ज्ञान, श्रद्धा व कौशल्ये आदीच्या नियमनातून काही जीवनमूल्ये प्रदान करीत असते. त्यामुळे मानवी जीवन अधिकाधिक पुष्ट होण्यास मदत होते. मानवी जीवनाला अधिक सामर्थ्य व निष्ठा देण्याचे कार्य संस्कृती करते. त्यामुळे हजारो लोकांच्या मनावर व अंत:करणावर संस्कृती अधिराज्य गाजवत असते. अनादी काळापासून मानवाने या संस्कृतीच्या वहनासाठी विशिष्ट व्यवस्था निर्माण केली आहे. या व्यवस्थेमध्ये चिन्ह, चित्र, प्रतिमा प्रतिके याचा वापर करण्यात आला. त्याचबरोबर संस्कृतीच्या वहनासाठी भाषेचाही वापर करण्यात आला. साहित्यानेही या संस्कृतीवहनाचे कार्य केले आहे म्हणूनच संस्कृतीइतकेच करोडो लोकांच्या मनावर साहित्यानेही अधिराज्य गाजवले आहे. आजही ग्रामीण समाजमनावर संत साहित्य, शाहिरी साहित्य व लोकगीतांचा मोठा प्रभाव दिसतो. यावरून संस्कृतीशी अन्योन्य संबंध ठेवत वाटचाल करणारे साहित्य समाजावर प्रभाव पाडताना दिसेल. म्हणून समाज व संस्कृतीला वगळून साहित्याचा विचारच होऊ शकत नाही.

"साहित्य हा मानवी जीवनातील महत्त्वाचा सांस्कृतिक उपक्रम आहे. त्याचे कारण असे की, साहित्य हे समाजाचे आणि संस्कृतीचे रूप अभिव्यक्त करीत असते. विविध घटकांनी प्रभावित केलेले व्यक्तीमन आणि समूहमन, त्यातून आलेले समूहमानस यांच्या प्रवृत्ती, प्रेरणा, परंपरा यांचे प्रकटन साहित्य करीत असते. मानवी जीवनाचे भाष्य साहित्य करीत असते या म्हणण्यामागे हीच भावना असते."[४] संस्कृती ही परिवर्तनशील असते. कोणतीही संस्कृती काळानुरूप बदलणे गरजेचे असते. ती बदलली नाही तर तिच्यामध्ये साचलेपण येऊन ती समाजातील काही घटकांवर अन्याय करू लागते. समाजजीवन जसे स्थीर नाही त्याचप्रमाणे त्या समाजाची संस्कृतीही स्थीर नसते. जसजसा समाज बदलत राहतो. तसतसे संस्कृतीमध्येही बदल होत राहतात. ज्याप्रमाणे संस्कृतीमध्ये बदल होतो त्याप्रमाणे साहित्यामध्येही बदल होताना दिसतो. समाज, संस्कृती व साहित्य परस्परपुरक चालत असतात. त्यामुळे जसा समाज तशी तेथील संस्कृती व जशी समाजाची संस्कृती तसे त्या समाजाचे साहित्य असा हा अनुबंध असतो.

समाजाच्या विकासासाठी उन्नत साहित्य आणि उन्नत संस्कृतीची आवश्यकता असते. त्याशिवाय प्रगत समाजाची निर्मिती होऊ शकणार नाही. याविषयी डॉ.प्रल्हाद लुलेकर म्हणतात, "उन्नत संस्कृती उन्नत साहित्य आणि उन्नत साहित्य उन्नत संस्कृती निर्माण करते. सतत लोकांना नवनवे शिक्षण देण्याची, ज्ञान देण्याची, त्यांची कौशल्ये विकसित करण्याची प्रक्रिया ज्या समाजात चालू असते तो समाज अधिक प्रगती साध्य करतो. या प्रक्रियेत संस्कृती अधिक परिवर्तनशील असावी लागते. काळानुरूप परिवर्तनशीलता असणे हे संस्कृतीचे महत्त्वाचे लक्षण असते. संस्कृती परिवर्तनशील नसेल तर संस्कृती - उपसंस्कृतीमध्ये संघर्ष होतात. संस्कृती परिवर्तनशील असेल तर समाजाची उन्नती होते. ज्या संस्कृतीने अशी उन्नती साध्य केली आहे त्या समाजाचे साहित्य उन्नत होते."[५] व्यक्ती व्यक्तींनी समाज बनत असतो तरी समाजाला स्वत:चे एक अस्तित्व व महत्त्व प्राप्त झालेले असते. या समाजाची एक जीवन जगण्याची पद्धती असते. ती परिवर्तनशील असते. समाज विकासासाठी संस्कृती परिवर्तन महत्त्वाचे असते. या समाजातील एक घटक म्हणजे लेखक किंवा साहित्यिक असतो. त्याची जडणघडण समाजातच होत असते. तो आपल्या समाजातील विविध बाबींकडे पाहत असतो. त्याची जीवनाकडे पाहण्याची एक मूल्यदृष्टी तयार झालेली असते तीही याच समाजामध्ये तयार होते. कलावंताना समाजामध्ये एक निश्चित भूमिका असते आणि त्याच भूमिकेतून त्याचे साहित्य निर्माण होत असते. असे साहित्य नवसमाज निर्मितीसाठी व संस्कृतीच्या विकासासाठी महत्त्वाचे ठरते. त्यामुळे समाजाशिवाय संस्कृती, संस्कृतीशिवाय समाज, समाजाशिवाय साहित्य व साहित्याशिवाय समाज व संस्कृतीचा विकास संभवत नाही इतका यातील अनुबंध अतुट व महत्त्वपूर्ण आहे.

**संदर्भ :**

१. कोत्तापल्ले नागनाथ, साहित्याचा अन्वयार्थ, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, दुसरी आवृत्ती २००८, पृष्ठ ११
२. मुलाटे वासुदेव, साहित्य, समाज आणि परिवर्तन, स्वरूप प्रकाशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००७, पृष्ठ १९

ISSN : 2348-7143
October. 2018

३. मारवाडे नरेंद्र, आधुनिक मराठी वाङमयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी, कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००५, पृष्ठ मनोगत

४. लुलेकर प्रल्हाद व तुपे केशव, साहित्याचे सांस्कृतिक संचित, कैलाश पब्लिकेशन औरंगाबाद, प्रथमावृत्ती २००५,पृष्ठ २९

५. तत्रैव, पृष्ठ ३०, ३१

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**Peer Reviewed Referred**
**and**
**UGC Listed Journal**
**(Journal No. 40776)**

**AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY QUARTERLY RESEARCH JOURNAL**

ISSN 2277-5730



# AJANTA

**Volume - VII, Issue - IV**
**Marathi Part - I**
**October - December - 2018**

**IMPACT FACTOR / INDEXING**
**2018 - 5.5**
**www.sjifactor.com**

**AJANTA PRAKASHAN**

ISSN 2277 - 5730
AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
QUARTERLY RESEARCH JOURNAL

# AJANTA

Volume - VII | Issue - IV | MARATHI PART - I | October - December - 2018

**Peer Reviewed Referred and UGC Listed Journal**

Journal No. 40776

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

**IMPACT FACTOR / INDEXING**
**2018 - 5.5**
**www.sjifactor.com**

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖
**Ajanta Prakashan**
Aurangabad. (M.S.)

VOLUME - VII, ISSUE - IV - OCTOBER -DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 - IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# CONTENTS OF MARATHI PART - I


| Sr. No. | Name & Author Name | Page No. |
|---|---|---|
| २६ | इतिहास व सामाजिकशास्त्रासमोरील आव्हाने व उपाय<br>**प्रा. बोडके बालाजी रावसाहेब** | १२३-१२६ |
| २७ | जीवनरहस्याच्या शोधासाठी कुणा एकाची भ्रमणगाथा<br>**डॉ. एम. ए. कव्हळे** | १२७-१३० |
| २८ | दातृत्व संपन्न देवचंद शहा<br>**डॉ. संभाजी विश्वासराव माने** | १३१-१३६ |
| २९ | मराठेकालीन विवाह व स्त्रियांचे स्थान : एक अभ्यास<br>**भुयेकर पूनम रमेश** | १३७-१४० |
| ३० | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे इतिहास विषयक दृष्टिकोण<br>**रुपाली रामराव लांगडे** | १४१-१४४ |
| ३१ | श्री वारणा विभाग सत्कार्य संवर्धन मंडळ सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक व शैक्षणिक कार्य<br>**प्रा. डॉ. माधुरी राजाराम खोत** | १४५-१४८ |

VOLUME - VII, ISSUE - IV – OCTOBER - DECEMBER - 2018
AJANTA - ISSN 2277 - 5730 -IMPACT FACTOR - 5.5 (www.sjifactor.com)

# २७. जीवनरहस्याच्या शोधासाठी कुणा एकाची भ्रमणगाथा

**डॉ. एम. ए. कव्हळे**
मराठी विभाग, सुंदरराव सोळंके महाविद्यालय, माजलगाव जि. बीड.

कादंबरीकार गो.नी. दांडेकर यांचे कादंबरीलेखन अतिशय समृद्ध आहे. ष्कुणा एकाची भ्रमणगाथा॰ ही त्यांची कादंबरी कुणा एका भ्रमण करत असलेल्या नायकाचा प्रवास चित्रित करणारी आहे. हा नायक नर्मदा परिक्रमेसाठी निघाला आहे. नर्मदेच्या उगमापासून शेवटपर्यंत आणि दुसरीकडून शेवटापासून उगमापर्यंत ही परिक्रमा आहे. नायकाने ही परिक्रमा चित्तशुद्धीसाठी आरंभिली आहे. या कादंबरीमध्ये नर्मदा ही एक पात्र म्हणूनच येते. तिच्या विविध रूपाचे दर्शन कादंबरीमधून घडते. या नर्मदेच्या रूपाने मातेचा आदिबंध संबंध कादंबरीभर पसरला आहे. नायकाची परिक्रमा ही प्रवासाच्या आदिबंधाची द्योतक आहे. म्हणून ष्कुणा एकाची भ्रमणगाथा॰ या कादंबरीमधून प्रवासाचा आणि मातेचा आदिबंध अतिशय प्रभावीपणे चित्रित झालेला दिसतो.

या कादंबरीमधील प्रवाशी हा नर्मदेच्या परिक्रमेसाठी निघाला आहे. या प्रवाशाच्या प्रवासाचा विचार केला तर त्याने सर्व काही मागे ठेवले आहे. आपल्या घरापासून, आई वडिलांपासून तो खूप लवकर दूर झाला आहे. त्यानंतर त्याने शहरी जीवनाचा अनुभव घेतला आहे. या अनुभवात त्याला पैशाच्या आणि संपत्तीच्या मागे धावणारी माणसे दिसली आहेत, माणसाचे माणूसपण विसरलेली यंत्रयुगीन संस्कृती दिसली आहे. सर्व मोहांपासून मुक्त होत, आप्तेष्टांना बाजूला सारत या प्रवाशाने आपला परिक्रमेचा प्रवास सुरू केला आहे. हा परिक्रमावाशी नर्मदेची परिक्रमा करतात तशा इतर सामान्य साधुसारखा नाही. त्याने धर्माचे अवडंबर बाजूला सारले असून तो कोणत्याही पंथाच्या, धर्माच्या मतानुसार वागत नाही, साधुवेश धारण करून जीभेचे चोचले पुरविणारा आणि मंत्रातंत्रांना घाबरणारा अवधूत यापेक्षा तो वेगळा आहे. त्यामुळे त्याचा प्रवास हा जीवनरहस्याच्या शोधाचा प्रवास आहे. नर्मदेची विविध रूपे पाहायची, न्याहाळायची आणि जीवनाच्या अंतिम रहस्याचा शोध घ्यायचा अशी त्याची परिक्रमा आहे. आदिमानवाने निसर्गातील विविध बाबींचा शोध अशाच ध्येयाने प्रेरित होउन घेतला असावा. हा प्रवाशी त्याचेच प्रतिनिधित्व करताना दिसतो.

ष्कुणा एकाची भ्रमणगाथा॰ या कादंबरीमध्ये नायकाच्या परिक्रमेच्या निमित्ताने नर्मदेचे सुक्ष्म चित्रण आले आहे. नर्मदेच्या काठावरील वाळूमधून चालताना वडाची पाने पायाला टिकत नाहीत अशा अवस्थेत हा प्रवाशी नर्मदेचे सौंदर्य न्याहाळत प्रदक्षिणा करत आहे. या कादंबरीमध्ये नर्मदेच्या चित्रणातून मातेचा आदिबंध आविष्कृत झालेला दिसतो. आदिमानवाच्या लेखी भूमी, नदी आणि स्त्री या तीन गोष्टींना मातेचा दर्जा दिलेला दिसतो. मानवी जीवनाच्या प्रवाहामध्ये नदी, भूमी आणि स्त्री हया सर्जनाचे कार्य करतात. सर्जनक्षमता असल्याने त्यांना माता ही उपमा मिळाली आहे. नदीच्या बाबतीत तर अनेक कथांमधून ती माता असल्याचे सूचित झालेले आहे. गंगा हे अशाच प्रकारचे मातृरूप आहे. भारतीय संस्कृतीमध्ये गंगेबाबत आणि तिच्या मातृत्वाबाबत विविध कथा उपलब्ध आहेत. महाभारतातील भीष्म याची निर्मिती गंगेपासून झालेली कथा आहे. त्याचबरोबर इतर देशातही नदीपासून निर्माण झालेल्या माणसांच्या आणि नदीला माता म्हणून गौरविण्यात आल्याच्या कथा सापडतात.

नदीचेच रूप असलेले पाणी हे सर्जनाचे प्रतीक मानले जाते. म्हणून या पाण्यामुळे मानवी जीवन फुलते, समृद्ध होते. यादृष्टीने नदीचे पाणी आणि नदी यांना मानवी जीवनामध्ये मातेचे स्थान देण्यात आले आहे. भारतीय इतिहासातील मानवी समूह नदीच्या काठी वस्ती करून राहत होता आणि नदीमुळेच त्याचे जीवन सफल झालेले दिसते. या माणसांना सांभाळण्याचे, मोठे करण्याचे, त्यांचे पालनपोषण करण्याचे काम नद्यांनी केले आहे. म्हणून मानवाच्या मनामध्ये तिच्याबद्दल एक कृतज्ञतेची भावना आहे. नदीचा संबंध पाण्याशी असल्याने आणि पाणी हे जीवनाचे तत्व असल्याने पाण्यालाही मानवी मनामध्ये महत्त्वाचे स्थान आहे. मानवाचे शरीर ज्या पंचमहाभुतांपासून बनले आहे त्यातील एक प्रमुख तत्त्व म्हणजे पाणी आहे. या पाण्याचीही मानवाने विविध रूपामध्ये आराधना आणि पूजा केलेली दिसते. संहारक आणि संरक्षक अशा दोन्ही दृष्टीने पाण्याचा अनुभव मानवाने घेतला आहे. जन्मापासून ते मृत्यूपर्यंत पाण्याचे मानवी जीवनातील विविध विधीमधील स्थान प्रतीकात्मक आहे. मरणानंतर माणसाला आप्तेष्टांकडून पाणी पाजणे, मृताची राख आणि अस्थी पाण्यात टाकणे अशा विधीमागील भावना पाण्याचे मानवी जीवनातील अनन्यसाधारणत्व सिद्ध करणारी आहे. यादृष्टीने या कादंबरीमधील नायकाची नर्मदा परिक्रमा वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

या परिक्रमावासीयाने नर्मदेची परिक्रमा करण्यामागेही हेच आदिम तत्त्वज्ञान असावे. या परिक्रमेबद्दल डॉ. अरूणा ढेरे म्हणतात, श्मानवी जीवनाचे आदि अंत पोटात वागवणारे हे पाणी आहे. पृथ्वी गर्भातून वर येणारे अन् तिथेच परतणारे पाणी आहे. या गर्भजळात जन्म आणि मृत्यू हातात हात घालून नांदतात, म्हणून जन्मलेल्याला मृत्यू आणि मृताला नवजीवन या दोहोंचे आदिकारण हे सशक्त पाणी आहे. त्यालाच ही प्रदक्षिणा! जीवनाच्या काठावरून चालत आदिअंतांना प्रदक्षिणा घालण्याच्या मानवी इच्छेचे, जन्ममृत्यूचे गुढ उकलण्याच्या तीव्र आंतरिक जिज्ञासेचे हे प्रतीकरूप!श[1] या कादंबरीमधील प्रवाशीही नर्मदेला अनेक वेळा माता म्हणून बोलावतो. तिच्या पाण्याचा उल्लेख त्याने दुध असा करावा, यातूनही नर्मदा ही मातेच्या आदिबंधाची आविष्कारक आदिप्रतिमा असल्याचे स्पष्ट होते. या कुणा एकाची ही परिक्रमा सहज चालू झालेली नसून त्याने ती जाणीवपूर्वक सुरू केली आहे. मानवी जीवनाचे अंतिम वास्तव, जन्ममृत्यूचे गूढ आणि चित्तशुद्धी यांचा अर्थ समजण्यासाठी तो मातेच्या काठाने फिरतो आहे आणि जीवनाचा अनुभव समृद्ध करतो आहे.

या कादंबरीतील प्रवाशी हा जीवनाच्या शोधामध्ये निघालेल्या मानवाचा प्रतिनिधी आहे. त्याने आपल्यासोबत जीवनातील अनुभव आणि गीताभाष्याची प्रत घेतली आहे. ही गीताभाष्याची प्रत त्याच्याजवळ असली तरी पारंपरिक अध्यात्म विचाराविषयी त्याच्या मनामध्ये द्वंद्व आहे. अनेक साधू, बैरागी, योगी अशा पोथ्या सांभाळण्यावर आणि त्यातील तत्त्वज्ञानावर विलासी जीवन जगताना त्याने पाहिलेले आहेत. त्यांच्यामध्ये तो कधीही सामावलेला नाही, म्हणूनच भांग जवळ असूनही त्याला तो स्पर्श करत नाही. कोणी आपणास जेवू घालावे अशीही त्याची इच्छा नाही, असा सर्वापेक्षा वेगळा हा परिक्रमावाशी आहे. सर्व मोहापासून दूर राहूनही मोहाच्या झाडाखाली चिंतन करत बसण्याची त्याची रीतही निराळीच आहे. पारंपरिक विचाराचा पगडा त्याच्या मनावर असला तरी या पगडयातून तो स्वतःची सुटका करू पाहतो आहे. पारंपरिक विचाराचे ओझे त्याला टाळणे शक्य नाही, पण मनामध्ये त्याचा जाचही होत आहे. म्हणून शेवटी गीताभाष्याची पोथीही त्याने मागे ठेवली आहे. भोंडलच्या मठामधील विलासी जीवन त्याला अडकवू शकत नाही. असा हा प्रवाशी मानवी जीवनाच्या उत्क्रांतीचा प्रतिनिधी आहे. अशीच माणसे सृष्टीमधील अनेक गुढ गोष्टींची उकल करण्यामध्ये यशस्वी होतात.

ष्कुणा एकाची भ्रमणगाथा॰ मधील नायक जीवनाच्या वास्तवाला भिडू पाहतो. प्रवासामध्ये एका अवधूताने त्याने मंत्र म्हटल्याचा अविर्भाव केल्याने पळ काढला आहे. अशा भोंदु माणसावर त्याचा विश्वास नाही. वाटेमध्ये एका माणसाला भोपाळ येथील राजभविष्यकाराने सांगीतलेले भविष्य कसे खोटे आहे याविषयी तो सांगतो. पुढे भोंडलच्या मठापर्यंत त्याचा प्रवास होतो. भोंडलच्या मठामध्ये आल्यानंतर त्याला मठाधीश निश्चलपुरी भेटतात. हा भोंडलचा मठही प्रतीकरूप आहे. संन्यास आणि धर्माच्या नावावर अवडंबर माजविणारे आणि जीवनातील सर्व लालसांचा उपभोग घेणारे यांचा हा प्रांत आहे. संपत्ती, धन, शिष्यगण, हत्ती, घोडे असा ऐश्वर्यसंपन्न हा मठ आहे. या मठाचे अधिपती निश्चलपुरी हा मठ लिलया सांभळतात. दररोज मठामध्ये होणारे प्रसंग, घटना यांचा आढावा घेतात. अनेक मोठमोठे साधु, बैरागी या मठामध्ये येउन अडकतात. पुढील प्रवासाला न जाता भलेभले याठिकाणीच थांबतात.

कादंबरीतील नायकाने मात्र हा अडथळा किंवा चकवा पार केला आहे. या भोंडलच्या मठातील विलासी जीवनामध्ये तो अडकत नाही. प्रवाशाबरोबर हा चकवा निश्चलपुरी यांनीही पार केला आहे. कर्मकांडात्म धर्माची सर्व अवडंबरे झुगारण्यामध्ये नायकाला आणि निश्चलपुरीला यश आले आहे. यापुढील प्रवासामध्ये आणि आगोदरही नर्मदेची अनेक रूपे नायकाने पाहिली व त्याला भावली. नर्मदेची परिक्रमा करताना नर्मदेची विविध रूपे त्याला मातेसारखी भावली, त्याचबरोबर त्याच्या जीवनात आलेल्या स्त्रियांचीही रूपे त्याला मातेसारखीच भावली. त्याच्या जीवनामध्ये आईचे प्रेम पुसटपणे लाभले आहे. या आईच्या प्रेमाची आठवण त्याला नेहमी येते. आईनंतर बहिणीचे प्रेम त्याच्या जीवनाचा महत्त्वाचा भाग आहे. तसेच त्याने भूमीलाही आई म्हटले आहे. या नायकाच्या जीवनामध्ये आलेली यशोदाही नर्मदेचेच रूप आहे. मातृत्वाचा आदिबंध कादंबरीभर असाच पुष्ट होत गेला आहे. श्धरणी माते, मला गर्भाधानाचे मंत्र येत नाहीत. त्याची आवश्यकताही नाही. वा–याचे झोत झुडपांच्या पोकळीत शिरून विचित्र आवाज काढताहेत. तेच गर्भाधानाचे मंत्र असतील. उद्याच्या जीवनासाठी आज या पंचाग्नीत भाजून निघण्याची तुझी तपश्चर्या चालू आहे.श्[2] असे त्याला भूमीचे जाणवलेले रूपही मातेचेच आहे. यावरून त्याला मातृभावाविषयी वाटणारे अटळ, नैसर्गीक आकर्षण चित्रित होते.

परिक्रमा करताना हा नायक पंडित रामाधार यांच्याजवळ पोहोचतो. नर्मदेकाठच्या एका मंदिरामध्ये रामाधार, त्यांची मुलगी यशोदा आणि काही मुले राहतात. यशोदा ही वीस वर्षाची तरूण विधवा आहे. प्रवाशाने या मंदिरामध्ये प्रवेश केल्यावर त्याच्या ज्ञानाने पंडित रामाधारजी खूष होतात. पुढील प्रवासाला निघण्यापुर्वी नायक आजारी पडल्याने पंडित रामाधारजी प्रवासाला जातात व नायक याच मंदिरात राहतो. याठिकाणी यशोदा आणि नायकाच्या भावसंबंधाचा उलगडा लेखक करत जातो. यशोदा ही नर्मदेचे रूप आहे. नायकाच्या मनामध्ये तिच्याविषयी असलेली भावना दोन पातळीवर येताना दिसते. ज्या मंदिरामध्ये या यशोदेची भेट झाली ते मंदिर मातृत्वाच्या आदिबंधाची आदिप्रतिमा आहे. म्हणून नायकाला यशोदेमध्ये माता दिसते. त्याच्या आजारपणात यशोदेने मुलांकडून त्याची केलेली सेवा, त्याच्या जेवणाची घेतलेली काळजी ही त्याचीच उदाहरणे आहेत. पण यशोदेचे दुसरे रूपही महत्त्वाचे आहे. ती नायकासाठी अनिमा म्हणून येते. झोपताना त्याच्या उशाशी मोगरा ठेवणारी, त्याला हव्या असलेल्या प्रत्येक गोष्टीची पुर्तता करणारी आणि त्याला आपले बळ देणारी यशोदा ही अनिमाचे रूप आहे.

मानवी जीवनाच्या पातळीवर स्त्री पुरूष संबंध महत्त्वाचा असतो. या कादंबरीतील नायक स्त्रियांपासून नेहमीच दूर राहिला आहे. पण यशोदेच्या सहवासात आल्यानंतर तो भावनिक आणि मानसिक पातळीवर तिच्यामध्ये

गुंतत जातो. हे यशोदा आणि नायकाचे नाते डॉ. अरूणा ढेरे यांना प्रकृती पुरूषाचे वाटते. त्या म्हणतात, श्या पुरूषाला प्रकृतीच्या कियाशीलतेबद्दल कौतुक आहे. तिच्या सर्जनक्षमतेबद्दल आदरभाव आहे. तिच्या मातृरूपाबद्दल पूज्यभाव आहे. तिचे आकर्षण आहे, तिची ओढ आहे आणि तिच्याबद्दल नम्रताबुद्धीही आहे. यशोदा त्याच्या लेखी माताही आहे आणि सहचारीही आहे. मांजरीच्या लेखी जसा तिचा पती असतो, तसे या दोघांचे नाते पतीचे आणि पुत्राचेही. आईचे आणि कांतेचेही हा लपंडाव उन पावसासारखा सदैव चालू राहिलेला दिसतो. कधी ही यशोदा माता अन्नपुर्णा असते, तर कधी मोगरा कुण्या भटक्याच्या उशाशी मुक्याने ठेवणारी अवघी वीस वर्षाची तरूणी असते. कधी ती भूमीची कन्या असते, तर कधी नर्मदेची!श्[3] याचाच अर्थ यशोदेने कधी नर्मदेच्या रूपात, कधी भूमीच्या रूपात तर कधी अनिमाच्या रूपात नायकाला बळ देण्याचे कार्य केले आहे. शेवटी यशोदा नायकाला पुढील प्रवासासाठी पाठविताना दिसते.

ष्कुणा एकाची भ्रमणगाथा॰ या कादंबरीचा विचार करता प्रवासाचा आदिबंध, मातेचा आदिबंध हे दोन आदिबंध या कादंबरीमधून प्रभावीपणे आविष्कृत झाली आहेत. ही कादंबरी नर्मदेच्या परिकमेची कथा असली तरी नायकाच्या जीवनप्रवासाची ती कहाणी आहे. नायकाला जीवनामध्ये अनुभव घेत घेत हा प्रवास करायचा आहे. कादंबरीकार गो. नी. दांडेकर यांनी मातृत्वाची विविध रूपे कादंबरीमधून चित्रित केली आहेत. नर्मदा, यशोदा, बाळाला दुध पाजणारी आई, कपडे बदलणारी स्त्री ही नायकाला जाणवलेली व भावलेली मातृरूपे आहेत. मानवी जीवनाच्या प्रवासात अशा मातृरूपाने बळ देण्यामुळेच जीवनाचा प्रवास सुखकर होत असतो. नायकाची भूक, तहान भागवणारी जशी नर्मदा त्याची माता आहे, त्याचप्रमाणे त्याला जीवनाचा एक लहानसा खंड साथ देणारी, त्याची काळजी घेणारी यशोदाही एक माताच आहे. मानवी जीवनाचा प्रवासही अशाच मातेच्या बळाने पूर्ण होत असतो. त्याचबरोबर मानवी जीवनाच्या प्रवासामध्ये धनात्मक मातेबरोबरच धनात्मक अनिमाही महत्त्वाची असते.

मानवी जीवनाचा प्रवास असाच युगांयुगाच प्रवास आहे. या प्रवासामध्ये नर्मदेसारखी माता आणि यशोदासारखी माता व प्रेयसी यांचे बळ मिळाल्यास मानवी जीवनाचा प्रवास सुखकर होतो, मानवी जीवनाच्या अंतिम वास्तवापर्यंत पोहोचण्यासाठी नायकाच्या जीवनात स्त्रीचे स्थान अनन्यसाधारण असते. गो. नी. दांडेकर यांच्या ष्जैत रे जैत॰ या कादंबरीमध्येही चिंधीमुळेच नाग्याला विजयाचा आनंद मिळाला आहे. ष्कुणा एकाची भ्रमणगाथा॰ मधील यशोदाही नायकाला बळ देउन पुढील प्रवासासाठी पाठवणारी आहे. या प्रवाशाचा प्रवास जीवनरहस्याच्या शोधासाठी आहे. आणि यशोदेमुळेच तो पूर्ण होणार आहे. कादंबरीतील नायकांना स्त्रीतत्वाचे बळ मिळाल्याने नायक आपल्या ध्येयापर्यत पोहोचण्यात यशश्वी झाले आहेत. हीच वास्तवता मानवी जीवनाच्या प्रवासाचीही आहे हेच कादंबरीकाराला सूचवायचे असावे.

**संदर्भ**

१. ढेरे अरूणा, काळोखाचे कवडसे, सुरेश एजन्सी, पुणे, नोव्हेंबर 1987, पृष्ठ 111

२. दांडेकर गो. नी., कुणा एकाची भ्रमणगाथा, मौज प्रकाशनगृह, मुंबई, बारावी आवृत्ती जानेवारी 2012, पृष्ठ 07

३. ढेरे अरूणा, काळोखाचे कवडसे, सुरेश एजन्सी, पुणे, नोव्हेंबर 1987, पृष्ठ 117